




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७४ ■ सोमवार, दि.१३ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# भीषण अपघात; आठ जणांचा मृत्यू

## कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील घटना ; मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी १३ एप्रिल

**कल्याण :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात अपघातांचे सत्र सुरु आहे. त्यातच आता कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. यामुळे संपूर्ण परिसर हादरुन गेला आहे. रायते पुलावर सिमेंट मिक्सर आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या इको कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात इको कारमधील ८ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर उर्वरित प्रवासी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही इको कार कल्याण ते मुरबाड या मार्गावर प्रवासी वाहतूक करत होती. पाच आसनांच्या या गाडीत १२ प्रवासी कोंबून भरले होते. ही गाडी सुसाट वेगाने मुरबाडच्या दिशेने जात होती. याचवेळी रायते पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सर ट्रकची आणि इको कारची समोरासमोर भीषण धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की संपूर्ण कारचा चक्काचूर झाला.



### मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू

या भीषण अपघातात मृतांमध्ये ५ पुरुष आणि ३ महिलांचा समावेश असल्याचे प्राथमिक वृत्त आहे. अद्याप यातील कोणाचीही ओळख पटलेली नसून, टिटवाळा पोलिसांकडून मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तसेच या घटनेमुळे नियम धाब्यावर बसवून होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आता यावर काय ठोस उपाययोजना केली जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यामुळे प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. या अपघातावेळी मोठा आवाज झाला. तो ऐकताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यानंतर स्थानिकांनी मदतीसाठी हातभार लावला.

# माणसाने किमान कृतज्ञता ठेवायलाच हवी- खा. संजय राऊत



प्रतिनिधी १३ एप्रिल

**मुंबई :** अजित पवार यांचा अपघाती मृत्यू झाल्यावर त्यांची पत्नी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री पद मिळाले. खासदारकीचा राजीनामा देऊन त्यांनी राज्याच्या राजकारणात पाऊल ठेवले. आता बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून त्या आमदार म्हणून विधानसभेत जातील हे जवळपास निश्चित आहे. ही निवडणूक बिनविरोध होऊ शकलेली नाही, पण सुनेत्रा पवार यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. शरद पवार यांनी स्वत: फोन केल्यावर काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतला. तसेच, आता सुनेत्रा पवारांसाठी सुप्रिया सुळे प्रचार करणार असल्याचेही सांगितले जात आहे. याचदरम्यान, उद्धवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी महत्त्वाची विधाने केली.

### सुनेत्रा पवार भावी मुख्यमंत्री?

'अजित पवार यांना मुख्यमंत्री होता आले नाही. पण सुनेत्रा पवार यांना जर भाजपा मुख्यमंत्री करणार असतील, तर तो भाजपच्या मनाचा मोठेपणा आहे. देवेंद्र फडणवीस केंद्रात जाण्याआधी एकनाथ शिंदे यांच्या ऐवजी सुनेत्रा पवारांना राजकीय वारसदार बनवून जात असल्याचे या बोलण्यातून दिसते,' असा टोला संजय राऊत यांनी लगावला.

खासदार संजय राऊत म्हणाले, 'शरद पवार यांच्या अस्तित्वाशिवाय बारामती आहे का? मोदी आणि शाह यांनी कुणालाही पदे दिली असतील, पण शरद पवार यांनी जर बारामती उभी केली नसती; तर त्यापुढच्या कोणत्याही पवारांना महाराष्ट्रात कुठलंच स्थान मिळालं नसतं. त्यामुळे माणसाने किमान कृतज्ञता ठेवायलाच हवी. तुम्ही कितीही टाळण्याचा प्रयत्न केलात तरीही तुमच्या पाठीशी पवारांची पुण्याई आहे.

# पश्चिम बंगालचे विभाजन करण्याचा केंद्राचा डाव !

प्रतिनिधी १३ एप्रिल

**कोलकाता :** भारतीय जनता पक्षाकडून तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांना धमकावण्यात येत आहे व आमच्या मंत्र्यांनादेखील त्यांच्याकडून धमक्या मिळत आहेत, असा आरोप प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी येथे एका सभेत केला. प. बंगालचे विभाजन करण्याचा केंद्र सरकारचा डाव आहे, असा आरोपही त्यांनी केला. मतदारसंघांच्या फेररचनेच्या



माध्यमातून केंद्र सरकार बंगालचे तुकडे करू पहात आहे. बंगालचा काही भाग बिहारला व ओडिशाला जोडण्याचा त्यांचा डाव असून त्यामुळे तेथील बंगाली नागरिकांचे अतोनात हाल होतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. आमच्या सरकारला सत्तेतून घालवण्यासाठी भाजपने एक हजार कोटी रुपयांचा व्यवहार केला आहे', असा आरोपही त्यांनी केला. तृणमूलमधून हकालपट्टी करण्यात आलेले हुमायून कबीर यांचा एक कथित व्हिडीओ काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता. त्या संदर्भात त्यांनी हा आरोप केला. 'ममता यांना सत्तेतून हटवण्यासाठी मी कोणत्याही थराला जाईन व त्यासाठी भाजपचे नेते माझ्या संपर्कात आहेत. मला या कामाचे एक हजार कोटी रुपये मिळणार आहेत, असे ते त्या व्हिडीओत सांगताना दिसतात.

### एसआयआर हा मोठा घोटाळा

मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) हा अलीकडच्या काळात देशात झालेला सर्वांत मोठा घोटाळा आहे. मात्र, लवकरच तुमचेच सरकार गडगडणार असून तुम्ही लागू केलेले जनविरोधी कायदे आम्ही रद्द करू, असे त्या म्हणाल्या.

### 'बंगाल दाखवेल - ममताची क्षमता'

सायनी घोष सातत्याने काही ना काही वादामुळे चर्चेत राहतात. २०२२ च्या शिक्षक भरती घोटाळयात ईडीने त्यांची ११ तास चौकशी केली होती. सध्या त्या आपल्या गायन कौशल्याचा वापर राजकीय व्यासपीठावर करत असून, विशेषतः मुस्लीम बहुल भागात वातावरण निर्मितीसाठी 'हृदयात काबा डोळ्यात मदिना' या गाण्याचा वापर केला जात आहे. 'बंगाल दाखवेल - ममताची क्षमता' अशी घोषणाही त्यांनी दिली आहे.

# यवतमाळात प्रतिबंधित 'एचटीबीटी'ची जोरात विक्री !

## 20 लाखांचा मुद्देमाल जप्त; कृषी व पोलीस विभागाने केला रॅकेटचा पर्दाफाश

प्रतिनिधी १३ एप्रिल

**यवतमाळ :** जिल्ह्यात अवैध बियाणे विक्री आणि वाहतुकीविरोधात कृषी विभाग व पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या अनधिकृत एचटीबीटी (प्लॅटिनम ५ जी) कापूस बियाण्यांची चोरटी वाहतूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत प्रशासनाने सुमारे २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१२ एप्रिल रोजी यवतमाळ शहरात एका 'किया सोनेट' (जीजे-०९-५४८६) आणि अन्य एका चारचाकी वाहनातून प्रतिबंधित बियाण्यांची तस्करी होणार असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे कृषी विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरीत्या सापळा रचून ही वाहने अडवली. झडती दरम्यान पथकाला मोठ्या प्रमाणात अवैध साठा मिळून आला. यामध्ये 'प्लॅटिनम ५ जी' नावाच्या प्रतिबंधित कापूस बियाण्यांची ४०० पाकिटे (एकूण ८ पोते) आढळून आली. या जप्त केलेल्या बियाण्यांची बाजारभावानुसार किंमत ३ लाख ६० हजार रुपये आहे. २ चारचाकी वाहने आणि ३ मोबाईल फोन (किंमत १६.४० लाख), एकूण २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) प्रेमनाथ आडे यांच्या फिर्यादीवरून यवतमाळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेत असलेल्या आरोपींमध्ये संतोष ठाकरे (रा. चांदूर रेल्वे, जि. अमरावती), निखिल लंगडे (रा. आर्वी, जि. वर्धा), सतीश ठाकरे (रा. अमरावती) ही नावे आहेत. आरोपींविरुद्ध बियाणे कायदा १९६६, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या विविध कलमान्वये गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.



### अधिकृत विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करा!

शेतकऱ्यांनी अनधिकृत आणि प्रतिबंधित बियाण्यांची खरेदी करू नये, कारण यामुळे जमिनीचे आणि पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ शकते. अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# गॅस सिलिंडर घेऊन ग्राहक धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर !

## गॅस एजन्सीवर कारवाई करा ; जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यात घरगुती गॅस सिलिंडरचा साठा पुरेसा असून लोकांनी गॅस एजन्सीवर गर्दी करू नये, असे जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने सांगण्यात येत असले तरी परिस्थिती याच्या उलट असल्याचे वास्तव आज उघडकीस आले. अनेक नागरिकांना बुकींग केल्यानंतर दहा ते १५ दिवस सिलिंडर मिळत नसल्याने अखेर त्यांच्या संयमाचा बांध फुटल्याने नागरिकांनी खाली घरगुती सिलिंडर घेत थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. यावेळी त्यांनी शहरातील समर्थ गॅस एजन्सीवर कारवाई करा, अशी मागणी करीत निवेदन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना सोमवार, १३ एप्रिल रोजी दिले.



### सिलिंडरची होतेय काळाबाजारी!

शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत असल्याची तक्रार नागरिकांनी यावेळी केली. आम्हाला एक-एक महिना सिलिंडर मिळत नाही तर दुसरीकडे रात्रीच्या अंधारात अवैधरीत्या गॅसचे वितरण ज्यादा पैसे देऊन होत असल्याचा आरोपही यावेळी नागरिकांनी केला. ज्या एजन्सी बुकींग झाल्यानंतर घरगुती गॅस सिलिंडर वेळेवर देत नाही, त्यांच्या कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी त्यांनी लावून धरली.

अकोला शहरातील जुने शहर भागात असलेले समर्थ गॅस एजन्सी धारकाच्या मनमानी कारभारामुळे या ठिकाणी सिलेंडर करता येणारे ग्राहक चांगलेच त्रासले आहेत. सदर एजन्सीमधून गॅस सिलिंडर मिळत नसल्याने अखेर ग्राहकांनी रिकामे गॅस सिलिंडर घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय येथे धडक देत एजन्सी धारकावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.अखाती युद्धामुळे संपूर्ण राज्यासह अकोला जिल्ह्यात गॅस सिलिंडरची टंचाई जाणवत आहे. अकोला शहरातील काही गॅस एजन्सीवर ग्राहकांना वेळेवर गॅस सिलेंडर मिळत आहे तर बहुतांश गॅस एजन्सी धारक हे आपला मनमानी कारभार करीत असल्याने गॅस एजन्सीवर येणारे ग्राहक चांगलेच वैतागले आहेत. अकोला शहरातील जुने शहर भागात असलेल्या समर्थ गॅस एजन्सीवर नागरिकांना तासनतास रांगेत उभे राहून सुद्धा त्यांना गॅस सिलिंडर मिळत नसल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

# सेन्सेक्स १५०० अंकांनी कोसळला!

प्रतिनिधी १३ एप्रिल

**मुंबई :** आज (१३ एप्रिल)आठवड्याच्या पहिल्या ट्रेडिंग दिवशी, सेन्सेक्स १५०० अंकांनी घसरून ७६ हजारवर व्यवहार करत आहे. निफ्टी देखील ४५० अंकांनी घसरून २३५९० वर स्थिरावला आहे. आजच्या व्यवहारात सरकारी बँकांच्या शेअर्सची विक्री होत आहे. शुक्रवारी, सेन्सेक्स ९१९ अंकांनी वाढून बंद झाला होता. १० एप्रिल रोजी शेअर बाजारात तेजी होती. सेन्सेक्स ९१९ अंकांनी घसरून ७७५५० वर बंद झाला. निफ्टी देखील २७६ अंकांनी घसरून २४०५१ वर आला. बँकिंग आणि ऑटो क्षेत्रातील शेअर्समध्ये खरेदी झाली. इराण-अमेरिका चर्चेत ठोस करार न झाल्यामुळे बाजारात तीव्र अस्थिरता आहे. कच्च्या तेलाच्या अस्थिर किमती, परदेशी गुंतवणूकदारांची सक्रियता आणि जागतिक बाजारातील हालचाली हे देखील बाजाराची दिशा ठरवणारे महत्त्वाचे घटक असतील.

# तरुणाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या;तिघे ताब्यात

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अमरावती :** गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मीनगर भागात रविवारी मध्यरात्री रक्ताचा थरार पाहायला मिळाला. एका २१ वर्षीय तरुणाचा पाठलाग करून आरोपींनी अक्षरशः रस्त्यावर गाठून चाकूने सपासप वार त्याची निर्घृण हत्या केली. संतोष राजू बन (२१) रा. कपिलवस्तूनगर असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांविरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी पवन बन हा लक्ष्मीनगर येथील एका घराला रंगकाम करण्याचे काम करत होता. रविवारी मध्यरात्री १:३० च्या सुमारास त्याचा चुलतभाऊ संतोष हादेखील लक्ष्मीनगर येथील भोले शंकर मूर्तीजवळ आपल्या मित्रांशी गप्पा मारत बसला होता. याच वेळी दोन दुचाकींवरून आलेल्या सहा जणांच्या टोळीने जुन्या वादाचा उच्छाद मांडत संतोषला शिवीगाळ सुरू केली. जिवाच्या आकांताने संतोषने तिथून पळ काढला. मात्र आरोपींनी पाठलाग करून त्याला चाकूने वार करीत गंभीर जखमी केले.

# अमेरिका करणार होर्मुझा सामुद्रधुनीची नाकेबंदी!

वृत्तसंस्था १३ एप्रिल

**वॉशिंग्टन :** इराण आणि अमेरिकेची चर्चा फिस्कटल्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी करणार आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीकडे अमेरिका पाणसुरूंगरोधी जहाजं पाठवण्याची तयारी करत आहे, अशी माहिती समोर येत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीकडे जाणाऱ्या-येणाऱ्या जहाजांचं नियंत्रण अमेरिका करेल, असं ट्रम्प यांनी जाहीर केलंय. इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण सोडायला तयार नाही.

# भारतीय हवामान विभाग जाहीर करणार मान्सूनचा अंदाज!

वृत्तसंस्था १३ एप्रिल

**नवी दिल्ली :** यंदा देशात मान्सून कसा राहणार, पाऊस सरासरी गाठणार की कमी पडणार? या प्रश्नाचे उत्तर आज मिळणार आहे. भारतीय हवामान विभाग आज सोमवारी दुपारी ४ वाजता नैऋत्य मान्सूनचा आपला पहिला अधिकृत दीर्घकालीन अंदाज जाहीर करणार आहे.

नवी दिल्लीतहोणाऱ्या या पत्रकार परिषदेला पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा उपस्थित राहणार आहेत. काही खाजगी वेधशाळांनी यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमकुवत राहण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, अधिकृत सरकारी यंत्रणा काय भूमिका घेते, याकडे देशातील बळीराजा आणि सर्वसामान्यांचे डोळे लागले आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा अंदाज अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.दरम्यान, पुणे शहरात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून तापमानाने चाळिशीचा टप्पा ओलांडला आहे. वाढत्या उष्णतेमुळे पुणेकर हैराण झाले असून हवामान खात्याने बुधवारी शहरासाठी 'येलो अलर्ट' जारी केला आहे.







सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
सोमवार, दि.१३ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com


# सुरेश पाचकवडे यांची कविता नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात



**अकोला:** येथील ज्येष्ठ साहित्यिक कवी, कथाकार सुरेश पाचकवडे यांच्या 'वादळ' ह्या कवितेचा समावेश राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी. कॉम द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात करण्यात आल्याचे नागपूर येथील भाषा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. गणेश चव्हाण सरांनी कळविले आहे. 'वादळ' या कवितेत कवीने आपल्या कवितेशी केलेला संवाद आहे. मनातल्या, जीवनातल्या वेदना - संवेदनांची उकल कवी आपल्या कवितेजवळ करतो. आणि मनातलं वादळ शमविण्याचा प्रयत्न करतो. सुरेश पाचकवडे यांची कथा - कवितेची सहा पुस्तकं प्रकाशित असून महाराष्ट्रातील विविध संस्थांनी आयोजिलेल्या सहा संमेलनांचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. त्यांच्या 'गोंदणवेणा'कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. पाचकवडे विदर्भ साहित्य संघ शाखा अकोलाचे उपाध्यक्ष, मराठी भाषा समितीचे अशासकिय सदस्य, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे सल्लागार आणि साद बहुउद्देशीय संस्थाचे कार्याध्यक्ष आहेत. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही त्यांची कविता समाविष्ट आहे.

# एकीकडे शिक्षण विभागाची पट पडताळणी, दुसरीकडे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित

## प्रश्नपत्रिका अपुऱ्या; शिक्षकांना झेरॉक्ससाठी आर्थिक भुर्दंड



महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार, वर्ग १ ते ८ साठी शालेय शिक्षण विभागातर्फे सत्रनिहाय मूल्यमापन आणि वार्षिक परीक्षा (संकलित मूल्यमापन २) आयोजित केली जाते. नवीन नियमांनुसार ५ वी आणि ८ वी च्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षा देणे अनिवार्य आहे. या परीक्षा सामान्यतः एप्रिल महिन्यात घेतल्या जातात. सध्या राज्यभर वर्ग २ ते ८ पर्यंतच्या संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षा घेण्यात येत असून यामध्ये प्रचंड अनियमित्ता व नियोजनाचा अभाव निदर्शनास आला आहे. राज्यातील सर्वच शाळांमध्ये असंख्य विद्यार्थी शिक्षण घेत असून प्रत्येक विद्यार्थ्याला ही परीक्षा देणे अनिवार्य आहे. परीक्षा घेण्यासाठी शासनाला प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देणे महत्त्वपूर्ण व अनिवार्य आहे. शालेय संच मान्यते नुसार विद्यार्थ्यांच्या प्रत्येक शाळेचा सरासरी संख्येच्या आधारे प्रश्नपत्रिका शाळेमध्ये पोहोचविल्या जातात. संचमान्यतेच्या आकडेवारीनुसार प्रश्नपत्रिकांची छपाई करण्यात येते, म्हणजेच प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना पुरेपूर मिळणे अपेक्षित आहे. सुरुवातीला पायाभूत चाचणीसाठी तसेच संकलित चाचणीसाठी प्रश्नपत्रिका अपुऱ्या दिल्या होत्या, यावेळी सुद्धा प्रश्नपत्रिका संचामध्ये मोठी तफावत बघावयास मिळाली आहे. प्रश्न संच कमतरतेमुळे मागील पायाभूत व संकलित परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागले होते. सदर परीक्षा घेणे अनिवार्य असल्यामुळे शाळेतील शिक्षकांना मागच्या वेळी सुद्धा स्वखर्चाने प्रश्नपत्रिकांची झेरॉक्स करण्याचे सूचना प्रशासनामार्फत मिळाल्यानंतर शिक्षकांना बाजारांतील झेरॉक्स च्या दुकानामधून झेरॉक्स कराव्या लागल्या. त्यामुळे शासनाच्या गोपनीय प्रश्नपत्रिकेचा बाहेर प्रसार तर झालाच परंतु शिक्षक व विद्यार्थ्यांना आर्थिक, मानसिक व शैक्षणिक त्रास ही सहन करावा लागत आहे. यावेळी सुद्धा अशीच परिस्थिती शिक्षकांना व विद्यार्थ्यांना भोगावी लागत असल्याचे चित्र बघाव्यास मिळत आहे.

प्रशासनाची विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षा देण्याची तरतूद असल्यानंतर सुद्धा विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लागणाऱ्या प्रश्नपत्रिका संच सुद्धा बाजारातून झेरॉक्स करून घेण्यास भाग पडत आहे. संच मान्यतेनुसार विद्यार्थ्यांना संकलित मूल्यमापन प्रश्नपत्रिका संच दिल्या जात असल्याचा कागदोपत्री अहवाल सादर केला आहे, परंतु प्रत्यक्षात मात्र विद्यार्थ्यांना अपुरे प्रश्नपत्रिका संच मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. यावेळेला मात्र शिक्षण विभागामार्फत पट - पडताळणी जाहीर केली आहे, ती सुद्धा व्हिडिओ रेकॉर्डिंग सहित होणार असल्याचे सांगण्यात आले आहे आणि सदर पटपळतांनी ही शासनाच्या याच परीक्षे दरम्यान घेण्यात येणार आहे. परंतु सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अपुऱ्या प्रश्नपत्रिकेमुळे परीक्षेपासून वंचित राहावे लागत आहे, ही शोकांतिका आहे. त्यात अपुऱ्या प्रश्नपत्रिकेमुळे शिक्षकांना प्रश्नपत्रिका झेरॉक्स कराव्या लागत असल्यामुळे विनाकारण शिक्षकांना आर्थिक भूर्दंड पडत असून शारीरिक व

> शिक्षण विभागाकडून पट पडताळणी जाहीर झाली असून सदर पट पडतानाही व्हिडिओ शूटिंग सह शासनाच्या परीक्षेदरम्यान घेण्यात येणार आहे. ही संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षा शाळेमध्ये घेण्यासाठी बीआरसी मधून प्रश्नसंच कमी मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित राहावे लागले, विद्यार्थ्यांना परिक्षा सक्तीची असल्यामुळे शिक्षकांना प्रश्न संच बाहेरून झेरॉक्स करून आणण्याचे भाग पडले. विद्यार्थी शिक्षक व पालकांना त्रास सहन करावा लागला, तर शिक्षकांना आर्थिक व मानसिक विवंचनेतून जावे लागले. विद्यार्थी संख्या माहित असून सुद्धा छपाई कमी का झाली? एकीकडे पटाप पडताळणीसाठी कोटी रुपये खर्च करायचे आणि दुसरीकडे विद्यार्थी प्रश्नपत्रिका नसल्यामुळे परीक्षेपासून वंचित ठेवायचे, तर शिक्षक मात्र विद्यार्थ्यी परीक्षेपासून वंचित न राहण्यासाठी स्वतः खर्च करून प्रश्नपत्रिका झेरॉक्स करून विद्यार्थ्यांची परीक्षा घेत आहेत. याकडे प्रशासनाने गांभीर्यपूर्वक लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे, नाहीतर सदर परीक्षा प्रशासनाने रद्द कराव्यात.

मानसिक त्रास ही सहन करावा लागत आहे. नक्कीच शिक्षण विभागांमध्ये हा मोठा घोटाळा व भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास येत आहे. संच मान्यतेनुसार प्रश्न संचांची छपाई करण्याचे कागदोपत्री दाखविल्या जाते परंतु प्रत्यक्षात मात्र छपाई कमी होत असल्याचे दिसत आहे. सदर वितरणावर विचारणा केली असता प्रशासनाकडून प्रश्नसंच कमी प्राप्त झाल्यामुळे नाइलाज असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. प्रश्न संचाची छपाई कमी का होते? संच मान्यतेनुसार विद्यार्थ्यांना प्रश्नसंच का मिळाली नाही? व शिक्षण मंडळाकडून प्रश्नपत्रिकांचे संच कमी का आली? असे अनेक प्रश्न सध्या विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली असून कुठे भ्रष्टाचार होत आहे का, विद्यार्थ्यांची पट संख्या माहीत असल्यानंतर सुद्धा वारंवार प्रश्नसंच का कमी प्राप्त होतात याची पडताळणी करून विद्यार्थ्यांची होणाऱ्या शैक्षणिक, आर्थिक व मानसिक त्रासापासून सुटका करावी, अशी मागणी पालक, विद्यार्थी व शिक्षकांकडून होत आहे.

प्रा. प्रज्ञानंद थोरात
(शिक्षक व पत्रकार), अकोला
मो. ९८२२६७४४८७

# गावातील जिल्हा परिषद शाळांची दुर्दशा– एक गंभीर वास्तव

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी जिल्हा परिषद शाळांची स्थापना करण्यात आली. गोरगरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार व मोफत शिक्षण मिळावे हा यामागील मुख्य उद्देश होता. परंतु आज अनेक गावांप्रमाणेच अकोला जिल्ह्यातील हिवरखेड रुपराव (ता. तेल्हारा) येथील जिल्हा परिषद शाळेची स्थिती अत्यंत चिंताजनक बनलेली आहे.

एकेकाळी विद्यार्थ्यांनी गजबजलेली ही शाळा आज ओस पडलेली दिसते. दहा-पंधरा विद्यार्थी उपस्थित असले तरी शिक्षकांची कमतरता स्पष्ट जाणवते. शिक्षणाची गुणवत्ता घसरल्यामुळे पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास कमी होत चालला आहे. परिणामी, अनेक पालक आपल्या मुलांना खासगी शाळांकडे वळवत आहेत. ही समस्या केवळ एका गावापुरती मर्यादित नसून संपूर्ण जिल्ह्यात आणि राज्यभर पसरलेली आहे. सरकारी शाळांकडे दुर्लक्ष, शिक्षकांची अपुरी भरती, आधुनिक सुविधांचा अभाव आणि खासगी शाळांच्या वाढत्या प्रभावामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वप्रथम, रिक्त शिक्षक पदांची तातडीने भरती करण्यात यावी. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा – जसे की डिजिटल शिक्षण, संगणक, इंग्रजी माध्यमातील शिक्षण पद्धती आणि विविध शैक्षणिक योजना – या सरकारी शाळांमध्ये उपलब्ध करून द्याव्यात. खासगी शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि शैक्षणिक दर्जा सरकारी शाळांमध्येही लागू केला गेला तर निश्चितच विद्यार्थ्यांचा ओढा पुन्हा सरकारी शाळांकडे वाढेल. यासोबतच, समाजातील सर्व घटकांनीही जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. विशेषतः स्थानिक राजकीय नेते आणि प्रतिष्ठित व्यक्तींनी आपल्या मुलांना सरकारी शाळांमध्ये शिक्षण देण्याचा आदर्श निर्माण केला, तर जनतेचा विश्वास पुन्हा प्रस्थापित होऊ शकतो. याशिवाय, शाळेच्या परिसरात सध्या सुरू असलेल्या अनैतिक व बेकायदेशीर प्रकारांकडेही तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. रात्रीच्या वेळी शाळेचा गैरवापर होत असल्याच्या घटना अत्यंत गंभीर आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे आणि गावकऱ्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

निवृत्ती तायडे
हिवरखेड रूप. ता. तेल्हारा
मो.:७७०९५१७०१९

# व्यक्ती विशेष

## महान बुद्धिबळपटू गॅरी कॅस्पारोव्ह



आज जन्मदिन

गॅरीक किमोवीच वेईनस्टीन म्हणजे गॅरी गॅरी कॅस्पारोव्ह यांचा जन्म १३ एप्रिल १९६३ मध्ये बाकू, अझरबैजान, यु.एस.एस.आर. येथे झाला. तो रशियन बुद्धिबळ ग्रँडमास्टर आहे. तो माजी बुद्धिबळ विश्वविजेता, लेखक आणि राजकीय कार्यकर्ताही आहे. कास्पारोव्ह इ.स. १९८५ मध्ये वयाने सर्वात लहान बुद्धिबळ विश्वविजेता बनला. फिडेचा हा किताब १९९३ पर्यंत त्याने स्वतःकडे राखला.

गॅरी कॅस्पारोव्ह हा माजी रशियन बुद्धिबळ विश्वविजेता, लेखक आणि राजकीय कार्यकर्ता. एलो मानांकनानुसार इ.स. १९८६ ते २००५ पर्यंत बुद्धिबळातील प्रथम मानांकन सतत मिळविण्याचा विक्रम त्याने केला. सलग स्पर्धा आणि चेस ऑस्कर जिंकण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. १९६३ साली या महान बुद्धिबळ खेळाडूचा जन्म मॉस्कोजवळच्या गावात झाला. १९८५ मध्ये वयाच्या बाविसाव्या वर्षी गॅरीने तत्कालीन बुद्धिबळ विजेता अनातोली कार्पोव्ह याच्यावर मात करून आपल्या पहिल्या जगज्जेतेपदाची नोंद केली. त्यानंतर १९८६, १९८७ आणि १९९० मध्ये पुन्हा अनातोलीवर मात करून स्वत:कडे विश्वविजेतेपद त्याने राखले. पुढे १९९३ मध्ये निगेल शॉर्ट याचा तर १९९५ मध्ये विश्वनाथन आनंद याचा पराभव करीत विश्वविजेत्याचा मान गॅरीने मिळवला. बंडखोर स्वभावाच्या गॅरीचे 'फिडे' या जागतिक बुद्धिबळ संघटनेशी मतभेद झाल्यावर १९८६ मध्ये त्याने ग्रँडमास्टर्स असोशिएशन या वेगळ्या बुद्धिबळ संघटनेची स्थापना केली. बुद्धिबळ खेळाच्या प्रसारासाठी गॅरीने जगभरहिंडून बरेच कार्य केले. इस्रायल, फ्लोरिडा, जर्मनी इत्यादी देशांमध्ये त्याने बुद्धिबळ अकॅडमी स्थापन केल्या. मार्च २००५ मध्ये गॅरी कॅस्पारोव्हने व्यावसायिक बुद्धिबळातून निवृत्ती स्वीकारली. त्यापुढे त्याने लेखन आणि राजकारण या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. सध्या वृत्तपत्रीय स्तंभलेखक म्हणून नाव झालेल्या गॅरीने मॉस्कोमध्ये संयुक्त नागरी आघाडी (युनायटेड सिव्हिल फ्रंट) स्थापन केली आहे. अलीकडे 'द अदर रशिया' या सध्याच्या रशियन फेडरेशनच्या अध्यक्षांच्या विरोधकांच्या आघाडीत म्हणजे व्लादिमीर पुतिन यांच्या विरोधकांच्या आघाडीत गॅरी सामील झालाय. २००८ मध्ये झालेल्या रशियन राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीसाठी तो सुरुवातीस उमेदवार म्हणून उभा होता. परंतु त्यासाठी आवश्यक असलेल्या काही औपचारिकता तो पूर्ण करू न शकल्याने निवड मंडळाने त्याला बाद केले. युरोप अमेरिकेत गॅरी याला रशियन अध्यक्ष पुतिन यांचा कट्टर विरोधक मानण्यात येते, परंतु रशियात गॅरीला पुरेसा जनाधिकार नाही. सध्या गॅरीचे वास्तव्य न्यूयॉर्कमध्ये आहे.

# आंबेडकरी निष्ठेनं झपाटलेला 'सोनबा'

आंबेडकरी चळवळीतील निष्ठेचा आणि त्यागाचा खरा नायक म्हणून 'सोनबा येलवे' यांचे नाव पुढे येते. इतिहासाने किंवा कवी, साहित्यीकाने सोनाबाचा त्याग, निष्ठेची, हवी तशी दखल घेतली नाही. म्हणून तसा सोनबा समाजाला कळला नाही. ध्येयाने प्रेरित झालेला मनुष्य काय करू शकतो, याचे एकमेव उदाहरण 'सोनबा' होय. ज्यांच्या घरची परिस्थिती चांगली, सर्वकाही सुस्थितीत असणारांची समाजकार्य करणाराची मोठी यादी निघू शकते. परंतू काम केल्याशिवाय ज्याची चूलच पेटू शकत नाही. पोटाची खळगी भरू शकत नाही असे असतानां ही उपासी-तापासी राहून आंबेडकरांप्रती निष्ठा जगासमोर प्रगट केली ती सोनबानेच! घरादारांवर, संसारावर तुळशिपत्र ठेऊन भीममय झालेल्या सोनबाचा थोडक्यात परिचय देतो आहे.



कुलाबा जिल्ह्यातील म्हसाळा तालुक्यातील कुडतुडी हे सोनबाचे गाव. पत्नी सखुबाई, भाऊ भांबु, वहिणी लक्ष्मीबाई, पुतण्या सखाराम सारे मिळून काबाडकष्ट करून जीवनाचा गाहा हाकीत असत. एके दिसी लय पाऊस आला. वादय वाऱ्यामंदी सोनबाचं घर वाहून गेलं. घरातील मंडई उघळ्यावर पळ्ळली. त्यातच सोनबाचा २ वर्षाचा संतू! संकटाच्या पायरी मान्साचा जीव सोतापेक्षा लेक्रा-बायावर ज्यादा अस्ते. घरदार वाहून गेल्यानं ह्या 'महार' जातीच्या लोकास्नी कोनी सहारा देत नायी. सोनबा गावात जाऊन विनवनी करून म्हन्ते, ''आमास्नी ढोराच्या कोट्यात तरी राहू द्या हो, बायको -लेक्राले पान्यात भिजलेलं पाहून गयावया करते.''निगरगठ्ठ समाजाच्या मनावर भेदाभेयीपायी कायीच फरक पडत नायी. तुमचा हात लागला तर ईटाय होईल. आमचे ढोरं बाटतील! म्हणून कोनीच मायेचा पदर पसरत नाही. 'मुंग्याले साखऱ्या टाकनारी व संकटामंदी मान्साला ढोरापरमानं हिन लेखनारी ही संस्कृती.' जाती-पातीचा इचार नसानसात भिनलेला असल्यानं उरफाट्या कायजाच्या मान्साले काय पाझर फुटील? संकटाच्या वक्ताले गावातल्या मान्सांनी हिनवल्याने सोनबा रडकुंडीले आला. हिरमुसून गेला महारवाड्यात परतून भावाला म्हन्ते, ''आपल्याले कोनी बी आदार देनार नायी, आपली फिकीर सोताच करा लागीन.'' पावसात भीजल्यानं सोनबा-सखूचा कायजाचा तुकळा 'संतू' तापीनं फनफनत होता. कायी केल्या ताप कमी होत नवता. लाळका संतू डोया उघळ्याले तयार न्होता. इलाज कऱ्याले डाक्तर नायी. कुडतुडी गाव सेहरापासून कोसो दूर! इलाज न झाल्यानं संतू मायबापाले, नातेवायीकाले सोळून गेला. घरात आक्रोस! ''माया सोन्यासार्का पोर्गा, आम्हाले सोळून गेला हो,''या गाववाल्यांनी ढोराच्या कोट्यात जरी आश्रय देला असता तरी माया संतू जगला असता बाप्पा'' असे म्हनून सोनबा-सखू ओक्सा-बोक्सी लळतात. कोनाले दया-माया नसते, तो काळच तसा क्रूर व्हता. 'सखू' या आघातानं गाव सोड्याचं ठरोते. ज्या पोटच्या गोयाले ९ मयने पोटात वागवलं, तय हातावरील फोळापरमानं जपलं. त्याचा अंत असा झोलला पावून कोन्तीबी माय असं दु:ख पचवू शकली नस्ती? सोनबाले वाटे, कसंही असलं तरी वाडवडीलाचं गाव! जिथं खेयलो, बागळलो, ते गाव सोळावं म्हन्जे मनाले पटत न्होतं. 'गावाले इसरते ते जगाले इसरते' असे सोनबाले वाटे. तसाही बाबासायेबानं समाजबांधवांना सेहराकळं जाअसा संदेश देला होताच. मुंबईत काकाजोळं रावू. हाताले लागल ते काम करू, सेहरात कोनी जात-पात पायत नायी. कुजकट इचाराचे गाव नसलेलंल बरं, छातीवर मोठा गोटा ठेऊन गाव सोळ्याचा इचार होतो. कुत्रे गावातून फिरून येत व्हते, त्यायचा कोनी बाट पायत नोते. मान्साची जींदगानी कुत्र्याहून निपत्तर झाली व्हती. अंगावर्चे कपळे, खा-प्याचे भांडे घेवून मुंबईचा पर्वास सुरु. ४-५ कोस चालायचे, संध्याकायी जे गाव लागीन तथी मुक्काम ठोक्याचा. समाजाचे जातभाई ओयखीचे दिस्ले की, त्यायचे सोबत त्या गावातच काम करायचे. असा नित्यक्रम होता. परक्या गावात समाजाची मान्स मायेची वागणूक द्यायचे. आपल्या मान्साच्या आपुलकीनं ''अंगावर मनभर मांस'' चढल्यागत सोनबाले वाटे. खेळोपाळी सुधारणा डाक्तर आंबेडकरांमुळे झाल्या हे अडानी सोनबाला लोक पेपर वाचत त्यातून समजे. त्या महामानवाची मूर्ति त्यो मनामंदी रंगवत व्हता. 'चवदार तळ्याचा सत्याग्रह', 'काया रामाचा सत्याग्रह' बाबाचा सारका इचार, बाबाला डोयाने पहायले मिळंल काय? असे नाना इचार डोसक्यात थयमान घालत व्हते. समाजातले लोक तवां बाबासायेबाले बापापेक्षाही बाप मानत. बाबाच्या साप्ताहिकाचे लोक पोतीसार्के सामूहिक वाचन करत. ''मी मरनार भी नि जगनार भी फक्त समाजासाठी''बाबाच्या ईचाराचा अडानी सोनबावर परभाव पळला व्हता. पेपरातला बाबाचा फटू घरामंदी लावायचा व पाया पळायचे. सोनबा निर्वेसनी, बायकोच्या शब्दाभाईर जात नोता. बायको सखूबाई गोरी-गोमटी व्हती. तिच्या कपायावरचं रुपयाएवळं कुकू असायचं. हातावर नवऱ्याचं नाव 'सोनबा' गोंदलेलं. बशीएवढा केसाचाा अंबाळा तिले लय सोभून दिसे. बाया मनायच्या, ''जोळा असावा तर सखू-सोनबासार्का!''

सन १९३९ चा काय असीन, सोनबाले धन्याबाबानं पनवेलच्या नाक्यावर हटेलामंदी लाकळं फोळ्याचं काम गवसून देलं. सोनबा लय मेहनती, इमानदार व्हता. संसार सुखामंदी व्हता. सोनबा म्हने, ''मायी लाकळं फोळ्याची कुऱ्हाळ माया लेकराच्या (सर्जाच्या) हातात देनार नायी.'' लयं कस्ट करीन, सर्जाला शिकवीन, बाबासार्क! माये बाबासायेब गरीबांसाठी लई झटतेत, आमचं सारं आयुष्य आमच्या बाबासायेबाले लाग देरे बाप्पा!!'' एकदा तरी बाबाचं दर्शन लाभाव, असा मनी ईचार यायचा. उनायाचे दिस व्हते. उन मी म्हणत व्हतं. येवळ्यात एक गाडी नाक्यावर आली. त्यातून गोऱ्हापान सायेब भाईर आला. सुटाबुतला सायेब हटेलात गेला, तवां मालक बी लय खुस झाला,नवकराले लगेच पानी घेवून पाठवलं, तो सायबाला म्हनाला, ''बोला सायेब, काय पायजे?'' साहेब म्हणाले, ''अहो, गाडीमध्ये डॉ. आंबेडकर साहेब आहेत, त्यांना गरम भजे व स्पेशल चहा फार आवडतो, लगेच पाठवा?'' आंबेडकरांचे नाव ऐकताच स्पृश्य मालक रागानं लालबुंद झाला व सायेबाले म्हनाला, ''सायेब, महाराला चहाच काय, गटारातलं पानी सुद्धा मियनार नायी. महाराले पानी पाजलेतर हटेल बाटल, चला चालते व्हा! गावातले हिंदू मले वायीत टाकतील, मले हटेल बंद करा लागीन, निघा इथून!'' सुटाबुटातला साहेब अ?ड. गडकरी होते.सर्व संवाद बाबासाहेबांनी ऐकला. सोनबा गाडीजवळ होता. बाबांच्या अश्रूंबरोबर हातातला गिलास गळून पडला. वकीलाने गिलात हटेल मालकाकडे भिरकावला. सोनबा गाडीजोळ गेला नतमस्तक होऊन म्हनाला, ''बाबा थोळं थांबा हो, मी घरून पानी घेवून येतो, पयत जातो व येतो.'' गडकरी अपमानानं अर्धमेले झाले. त्यांना वाटे, उगीच बाबांना आणले. बाबांचे नाव फालतू सांगीतले. ते स्वत:लाच कोसत होते. हटेल मालकाने देलेली जखम कायजाले भोकं पाडणारी होती. बाबा ढसाढसा रडले व गडकऱ्याला म्हणाले, ''बघाऽऽ, माझ्या सारख्याचे हे हाल! माझ्या महार बांधवांचे किती असतील!! गडकरी मला स्वत:ला हिंदू म्हणून घ्यायची लाज वाटते हो. '' गडकरी म्हणाले, ''बाबा माझं चुकलं त्याला तुमचं नाव सांगायला नको होतं.'' बाबा म्हणाले, ''मी त्या स्पृश्य हाटेल मालकाला दोषी समजत नाही. दोष संस्काराचा, जाती-धर्माचा, वर्ण व्यवस्थेचा याला मी दोषी माणतो.'' या गडबडीत बाबांना सोनबाचे भानच राहिले नाही. तहान लागलेली असतांना बाबा तसेच निघून गेले.

सोनबा पयतच दमफूस होत पान्याचं मळकं घेऊन आला. त्याला गाळी दिसेना, गर्दीबी पांगली, बाबा कुठी गेले असतीन? ''देवा, कितीक वर्षानं मनमंदिरात असणाऱ्याले डोयानं पायायचं भाग्य लाभलं हुतं, थोळं बोलावं, एखाद घोट पानी प्याले असते तर मनाला समाधान लाभलं असतं.''तहानेनं तरसलेले बाबा नक्कीच येतील. कावरा-बावरा होवून आपल्या जीत्या जागत्या देवाले पाहत व्हता. अपमान सहन न झाल्यानं बाबा तसेच निघून गेले होते. सोनबा हटेल मालकाले म्हनाला, ''घोटभर पान्यासाठी माया बाबाचा तू एवळा अपमान केलाय, त्येंचा अपमान त्यो माया अपमान! आजपासून तुयाकाठचं लाकळं फोळनं बंद! आमच्या दात्याचा तू घोर अपमान केलाय, जवा बाबा येतील माया मळक्यातलं घोटभर पानी पितील तव्हाच ही आग आता बुझील.'' बाबा रडले, मले पाहवलं नाय, लय कासाविस झाला व्हता. तो परसंग सोनबानं एवढा मनाले लावून घेतला की त्याले दुसरं कायीच सूचत नोतं. महापुरुषाला साध्या हटेलवाल्यानं अपमानीत करावं हे मनाले लावून घेतलं होतं. त्या दिसांपासून सोनबाचा एककल्मी कार्यक्रम ठर्ला, रामपायऱ्यात उठने, मळकं भरून घेणे व पनवेलच्या नाक्यावर बाबांची वाट पाहत बसने. त्याले वाटे बाबा एकदा तरी येतील व मळक्यातलं घोटभर पानी पीतील. सन १९३९ पासून ते १९४६ पर्यंत सलग ७ वरीस पर्यंत सोनबा त्याच जागी पान्यानं भरलेली घल्ली/मडकं घेवून बसे. लोकांनी त्याला येड्यात काढलं व्हतं. त्यो बायको-पोराले म्हने, ''मी येडा नायी, मी भीममय झालो, आंबेडकरमय झालो रे!''

झाडाखाली बसून बडबड करायचा, ''बाबा एकदा तरी या हो, डोये भरून पावू द्या हो!!'' समाजाची बी तुमाले लय कायजी हाये, तुमाले टाईम तरी कुठून सापळनार मना! किती वर्स झालेत वाट पावून. कोनीतरी बाबाले पानी प्यायले द्या हो, बाबाऽऽ बाबाऽऽ म्हनत सोनबानं नाकवरच जीव सोळला. ही घटना येथील लोकांनी बाबांना सांगण्याची हिम्मतच केली नायी. सतत ७ वर्षे सोनबा पनवेलच्या नाक्यावर बाबाची वाट पाहत होता म्हनून. शेवटी तेथील एका कार्यकर्त्याने खूप हिम्मत करून बाबांना ही घटना सांगीतली. जेंव्हा बाबासाहेबांना कळले तेंव्हा बाबाच्या डोळ्यात तो ७ वर्षापुर्वीचा काळ आठवला. पाणी आणायला गेलेला सोनबा आठवला. लगेच बाबा पनवेलच्या नाक्यावर आले. बाबांच्या डोळ्यात अश्रू वाहू लागले. फुटलेल्या घड्याची खापरं एकत्र करून त्याला श्रद्धांजली वाहली. सोनबाचे दर्शन घेतले. सोनबाच्या पत्नीची बाबाने घरी जाऊन माफी मागीतली व म्हणाले, ''तु माझ्या लेकीसारखी आहेस मला हे शेवटपर्यंत माहीत नव्हते. म्हणून मी येवू शकलो नाही. तुझ्या मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था मी करतो, सोनबाचे स्वप्न पूर्ण होईल. नयन भरल्या डोळ्याने बाबा बोलत होते.'' असे म्हणून बाबा निघून गेले. निष्ठावान सोनबा धन्य झाला. एका महामानवाची शेवटी का होईना सोनबाला भेट झाली. धन्य ती निष्ठा व धन्य तो सोनबा!!!निस्वार्थपणे बाबासाहेबांप्रती जीव ओवाळून टाकणाऱ्या सोनबाला कोटी कोटी विनम्र अभिवादन!

पंजाबराव ब. वर
अकोला.
मो. नं. ९९२२९२४६८४

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# वारखेड सौंदळा परिसरात वाघाची दहशत; गाय व गोऱ्हा केला ठार

**हिवरखेड:** वारखेड सौंदळा परिसरात वाघाची दहशत दिसते. नजीकच्या वारखेड शिवारात सुभाष म्हसाये यांच्या शेतात वाघाच्या हल्यात १ गाय व १ गो-हा ठार झाला. वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते.

परंतु वाघाला जेरबंद करण्यासाठी वन विभाग कशाची वाट पाहत आहे असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. तसेच यंत्रणा चालढकल करीत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

एखाद्या दिवशी वाघामुळे मानवी जीवन धोक्यात येऊ शकते. त्यामुळे दुर्लक्ष करू नका. तसेच वन्य प्राण्यांचा तातडीने बंदोबस्त करा अशी मागणी आहे.

# शिरला ग्रामपंचायत घोटाळा प्रकरणात लोकप्रतिनिधीसह मोठे नेते जबाबदार!

प्रतिनिधी १३ एप्रिल

**पातूर :** शिरला ग्रामपंचायतीमध्ये आशा स्वयंसेविका आणि ग्रामरोजगार सेवक भरती प्रक्रियेत झालेल्या अनागोंदीचा गाडा अखेर सचिवाच्या निलंबनापर्यंत येऊन ठेपला आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी श्री. दिलीप वाहोकार यांच्यावर निलंबनाचा बडगा उगारला असला तरी, या कारवाईने प्रशासकीय वर्तुळात अनेक अनुत्तरित प्रश्न निर्माण केले आहेत. मुळात ग्रामपंचायतीमध्ये कोणताही धोरणात्मक निर्णय किंवा नियुक्तीचा ठराव हा केवळ सचिवाच्या मर्जीने होत नसतो, त्याला सरपंचाची साथ आणि संमती लागतेच. अशा परिस्थितीत, आधीच तीन रोजगार सेवक असताना आणखी सात जणांची नियमबाह्य नियुक्ती करण्याचा 'अचाट' पराक्रम नेमका कोणाच्या आशीर्वादाने झाला, हे आता संशोधनाचा विषय ठरत आहे.

शासकीय नियमांची पायमल्ली करून राबवलेली आशा स्वयंसेविका भरती असो वा निकषांना हरताळ फासून घेतलेले रोजगार सेवकांचे ठराव, या संपूर्ण प्रकरणाला राजकीय हस्तक्षेपाची गडद किनार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. मात्र, प्रशासकीय यंत्रणेने केवळ एका कर्मचाऱ्याला दोषी धरून मुख्य सूत्रधारांना मोकळे रान दिल्याची भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. ही कारवाई म्हणजे गुन्हेगाराला शोधण्याऐवजी केवळ कागदोपत्री सोपस्कार पूर्ण करण्याचा प्रकार असल्याची टीका होत आहे. ज्यांनी या नियमबाह्य निर्णयांसाठी दबाव आणला किंवा ज्यांच्या संमतीने हे ठराव संमत झाले, त्यांच्यावर कारवाईची टांगती तलवार का नाही, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. केवळ एका व्यक्तीला निलंबित करून मूळ भ्रष्टाचार आणि राजकीय सेटिंगवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासन करत आहे का, अशी शंका घेण्यास आता वाव मिळत आहे. एका बाजूला पारदर्शक कारभाराचा दावा केला जात असताना, दुसऱ्या बाजूला मात्र 'मोठ्या माशांना' अभय देऊन केवळ 'बळीचा बकरा' शोधण्याची ही पद्धत लोकशाहीसाठी घातक ठरत आहे. जोपर्यंत या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी होऊन पडद्यामागचे खरे सुत्रधार समोर येत नाहीत, तोपर्यंत ही कारवाई 'न्याय' नसून केवळ 'निवडक शिक्षा' म्हणूनच ओळखली जाईल. आता प्रशासन या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन खऱ्या राजकीय धेंडांना चाप लावणार की ही फाईल धूळ खात पडणार, याकडे शिरलावासियांचे लक्ष लागले आहे.

> एका विशिष्ट समाजाच्या कर्मचारी अधिकाऱ्यांवर कारवाईचा जो बडगा उगारला जातोय, हा एक नियोजनपूर्वक कट असून प्रशासनाने केवळ सूडबुद्धीने ही कारवाई केल्याचे दिसून येते.
>
> **- प्रवीण इंगळे,** सामाजिक कार्यकर्ते

# संत गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा

**अकोला :** कुंभार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त अकोला येथे भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र कुंभार समाज विकास परिषद, अकोला तसेच श्री संत गोरोबाकाका सामाजिक कार्यकारी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुण्यतिथी उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात साजरा केला जाणार आहे.

या उत्सवाच्या पूर्वसंध्येला मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता मूर्तीपूजन व तीर्थस्थापन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र कुंभार समाज विकास परिषदेचे अध्यक्ष श्री रामकृष्ण नथ्थुजी साविकर भूषविणार आहेत. पुण्यतिथी दिनी बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता ह.भ.प. महंत श्री श्री १००८ स्वामी सुरेश्वरानंदजी गिरी उर्फ दासगिरी महाराज (रा. कृष्णाई गोरक्षण, आंबोडा ता. अकोट) यांच्या मधुर वाणीतील हरिकिर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

# प्रा. दिलीप कुमरे यांची पीएच.डी. पदवी प्रदान

**अकोला :** येथील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागात कार्यरत प्रा. दिलीप दामू कुमरे यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीतर्फे समाजशास्त्र विषयात आचार्य (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रा. कुमरे यांनी 'गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समुदायावर नक्षलवादी चळवळीचा झालेला परिणाम : एक समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर आपला संशोधन प्रबंध सादर केला. हा प्रबंध त्यांनी डॉ. बी. एम. कऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. त्यांच्या अभ्यासामुळे आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनावर नक्षलवादी चळवळीचा झालेला परिणाम समजून घेण्यास महत्त्वपूर्ण मदत होणार असून, शासनाच्या आदिवासी विकास धोरणांसाठीही हा अभ्यास उपयुक्त ठरणार आहे.

विशेष म्हणजे, प्रा. कुमरे हे गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील मेंढा या आदिवासी बहुल गावचे रहिवासी असून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे समाजशास्त्र विषयात मोलाची भर पडली आहे.

# बाळापूरला पोलिसांचे पथसंचलन



प्रतिनिधी १३ एप्रिल

**बाळापूर:** शहरातील जयंती, उत्सव यासाठी शांतता व सुव्यवस्था राहावी म्हणून पोलिसांनी आज सकाळी दहा वाजता पोलिस स्टेशन मधून संचलन करण्यात आले.

मुख्य बाजार चौक, शाही मशीद, अंजुमन बाजार रोड, जुनी चावडी, जैन मंदिर, गुजरातीपुरा, मुख्य बाजार चौक मार्गावरून सुरक्षा पाहणी करण्यात आली. लॉन्ग मार्च मध्ये बाळापूर पोलिस पथक, होमगार्ड पथक, विशेष सुरक्षा पथक मार्चमध्ये सामील झाले होते. ठाणेदार झोडगे, हिवाळे, नयन पाटील, कैलास मुंडे, महिला पोलीस, होमगार्ड लॉंग मार्चमध्ये सामील झाले होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अकोला येथे भीम गीतांच्या माध्यमातून मानवंदना

## सांस्कृतिक कार्य विभागाचा प्रेरणादायी उपक्रम

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला:** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'भीमगर्जना' विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्रातील सहा महसूल विभागात करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भीम गीतांची संगीतमय मानवंदना अर्पण करून डॉ. आंबेडकरांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम केवळ सांस्कृतिक सादरीकरणापुरता मर्यादित नसून, समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जाणीव करून देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या सामाजिक परिवर्तनातील योगदानाचा आढावा संगीत आणि सादरीकरणाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहे.

अकोला येथे हा कार्यक्रम सोमवार, १३ एप्रिल रोजी सायंकाळी ६:३० वाजता प्रमिलाताई ओक सभागृह, अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे.



कार्यक्रमात कुणाल भास्कर वाकोडे, सौ. किरण कुणाल वाकोडे तसेच सचिन जाधव (गिटार), जानराव बहाले (बासरी व क्लॅरिनेट), जयकुमार गुरु (कीबोर्ड), विशाल इंगळे (ढोलक), कार्तिक चंडाले (ढोल), नितीन गुरु (ऑक्टोपॅड), अनिकेत अंबुसकर (तबला) यांचा सहभाग असणार आहे. तसेच माणिकराव वानखडे हे सूत्रसंचालन करणार असून, आकाश वानखडे व प्रतीक आंबेकर हे कोरस म्हणून सहभागी होणार आहेत.

हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून साकार होत असून, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असून, राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव करण्याचा प्रयत्न यामधून करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आयोजित करण्यात आला असून, डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा व्यापक प्रसार करून समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची जाणीव अधिक दृढ करण्याचा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विविध घटकांतील नागरिक, विशेषतः विद्यार्थी व युवकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या सांस्कृतिक उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन बिभीषण चवरे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा आढावा बैठक

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला:** अखिल भारतीय मराठा महासंघ अकोला जिल्हा ग्रामीण, महानगर, युवक व महिला आघाडी शाखांची आढावा बैठक मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार, विभागीय उपाध्यक्ष योगेश थोरात, महिला विभागीय अध्यक्ष सौ कल्पनाताई बिडवे यांच्या प्रमुख उपस्थितीत व अकोला जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

रविवार दिनांक ५ रोजी कौलखेड रोड स्थित गायत्री नगर येथील जिल्हा कार्यालयात घेतलेल्या बैठकीत जिल्हा कार्यकारिणीसह महानगर शाखा, युवक शाखा व महिला शाखेच्या कार्यकारिणीची पुनर्बांधणी, कार्यविस्तार, सभासद नोंदणी, तालुका शाखा पदाधिकारी नेमणुका, कार्यकर्त्यांमध्ये सुसंवाद, संपर्क, प्रचार व प्रसार, आगामी वर्षभरात घ्यावयाचे कार्यक्रम, विविध विषयांवर शासन दरबारी निवेदने, आंदोलने, संघटनेचे काम करीत असताना पदाधिकाऱ्यांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या, समाज माध्यमांचा प्रभावी उपयोग आदि विषयांवर विचार विनिमय व सांगोपांग चर्चा होऊन ठोस निर्णय घेण्यात आले. नवीन व जुन्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटनात्मक बांधणी करण्यासंदर्भात यावेळी विनायकराव पवार यांनी मार्गदर्शन केले. योगेश थोरात, कल्पनाताई बिडवे, माधुरीताई वाघमारे, राजेश पाटील, सिंधुताई पवार, राखी पटेकर यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले.



कार्यक्रमाला अरुण खोटरे, श्रीकांत सरोदे, विठ्ठलराव वाघ, काशिनाथ पटेकर, जितेंद्र गावंडे, गजानन खराडे, प्रदीप लुगडे, रश्मीताई पटेकर, अनिता गावंडे, मीना लांडे, अपूर्वा लांडे, छाया वक्ते, उज्वला बावस्कर राखीताई पटेकर, रंजना रंभेकर, प्रवीण शिंदे, विपुल माने, विक्रम वाघमारे, संतोष वक्ते, श्याम देशमुख, नितीन पाटील, विशाल तायडे, राजेश गावंडे, प्रशांत गायकवाड, सुयोग देशमुख शुभम कांमळे, आकाश सुकाले, सागर कातकडे, अंकित कदम, अंकुश मोटे, अजिंक्य काळे आदी उपस्थित होते, असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सोशल मीडिया प्रमुख सचिन पाटील गोमासे यांनी कळविले आहे.

# आकाशात विविधरंगी प्रकाश उत्सव

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** समाज जीवनाच्या अधिक समृद्धीसाठी उन्हाळ्यात अनेक ठिकाणी विविध सप्ताह, शिबिरे, मेळावे आयोजित होत असतात.

सध्या स्थितीत आकाशात होणाऱ्या अनेक अनोख्या आकर्षक घडामोडींमध्ये सहभागी होण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राद्वारे करण्यात येत आहे. सूर्यमालेतील आठ ग्रहांपैकी नुसत्या डोळ्यांनी दिसणाऱ्या पाच ग्रहांपैकी मिथुन राशीतील गुरु ग्रह संध्याकाळी आकाश मध्याशी तर तेजस्वी शूक्र ग्रह वृषभ राशीत पश्चिम आकाशात ठळक स्वरूपात बघता येईल. पहाटे पूर्व आकाशात एकाच वेळी बुध, मंगळ आणि शनी ग्रहांच्या सुरु असलेल्या शर्यतीत सहभागी होता येईल. दि. १५ ला चंद्र मंगळ व बुध ग्रहाजवळ सोबत ४-५५ ते ५-०२ या वेळेत इंटरनॅशनल स्पेस स्टेशन तर दि. १६ ला चंद्र शनी जवळ, तसेच ४-०८ ते ४-१४ वा. आणि रात्री ७-५५ ते ८-०२ यावेळी आय.एस.एस. अर्थात फिरती चांदणी दिसेल.

> **जागतिक वसुंधरा दिनी समारोप**
>
> संपूर्ण सप्ताहात ग्रहांच्या हालचाली बघून या कार्यक्रमाची सांगता २१ व २२ रोजी रात्री दहा नंतर पूर्व आकाशात स्वरमंडळ (LYRA) तारका समूहातून विविधरंगी उल्का अर्थात तारे तुटतांना दिसतील. पहाटे या उल्कांचा वेग वाढलेला असेल.

दि. १९ ला पहाटे मंगळ व शनी ग्रह भेट तर याच दिवशी संध्याकाळी चंद्र शूक्र, दि. २२ चंद्र -गुरु भेट घेता येईल.

# प्रा. तृप्ती चौरे- इंगळे यांना आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध पुरस्कार

वि. प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोट :** डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, तेल्हारा येथे दि. ९ एप्रिल रोजी पार पडलेल्या होरायझन २०२६ इंटरनॅशनल मल्टी डिसिप्लिनरी कॉन्फरन्स (आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषद) मध्ये स्थानिक सेंट पॉल्स ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका सौ. तृप्ती चौरे- इंगळे यांनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. या परिषदेत त्यांना सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, गौरवचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. त्यांच्या शोधनिबंधाचा विषय 'ग्रीन केमिस्ट्री फॉर सस्टेनेबल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट रिसेंट 'ॲडव्हान्सेस अँड फ्युचर' असा होता.



या आंतरराष्ट्रीय परिषदेत देश- विदेशातील अनेक दिग्गज संशोधक व प्राध्यापकांनी आपले शोध निबंध सादर केले होते. आपल्या विषयाचे सखोल संशोधन व मांडणी यामुळे प्रा. तृप्ती यांनी निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाची दखल घेत निवड समितीने त्यांना सन्मानित केले. होरायझन २०२६ ही एक अत्यंत महत्त्वाची व प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषद आहे. जगभरातील विविध विषयातील संशोधकांना एकाच व्यासपीठावर आणणे हा परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

प्रा. तृप्ती यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया, उपाध्यक्ष लुनकरणजी डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, प्रा. निलिमा देशमुख, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे, वैशाली गावत्रे, तसेच सर्व शिक्षकवृंदाने त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# डोंगरगावात माळी समाजाकडून क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची १९९ वी जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** डोंगरगाव येथील माळी समाजाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी गायत्री नागापुरे व तनवी गवळी या विद्यार्थिनींनी तसेच उपसरपंच किशोर काकडे यांनी प्रभावी भाषणातून महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत समाजप्रबोधनातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. शिक्षण, सामाजिक समता व स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची माहिती देत उपस्थितांना प्रेरित करण्यात आले.



कार्यक्रमास प्रमोद भड, दीपक नागापुरे, रमेश देवकर, मधुकर देवकर, दिनकर भड, उत्तम काकडे, रमेश वानरे, मनोहर काकडे, श्रीराम वानरे, गोपाल नीलखन, काशिनाथ देवकर, नरेश नागापुरे, सुरेश काकडे, नमदेव वानरे, शिवदास मरकाम, हरिदास गवळी, मोहन गवळी, विनोद गवळी, राजेश मानकर, प्रफुल गवळी, उत्तम जवके, गणेश देवकर, सचिन जवके, राम गवळी, निखिल मानकर, रामचंद्र चांदणे, सागर नेवारे, मोहन नेवारे, उमेश महाराज साबळे, श्रीराम नागापुरे, शुभम नागापुरे यांच्यासह समाजातील व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक किशोर काकडे यांनी केले.

# भगवान परशुराम जन्मोत्सवाची तयारी जोरात

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव १९ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार असून, त्यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. यानिमित्त भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने मारवाडी ब्राह्मण संस्कृत विद्यालय, नीमवाडी येथे पूर्व नियोजन बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थान समितीचे पदसिद्ध अध्यक्ष तसेच राजस्थानी ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विजय तिवारी यांनी भूषविले. या बैठकीत महाराष्ट्रीयन, उत्तर भारतीय तसेच गुजराती ब्राह्मण समाजातील सर्व घटकांना एकत्र घेऊन १४ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. कार्यक्रमांची सुरुवात १४ एप्रिल रोजी भगवान परशुराम चौक, खोलेश्वर येथे धर्मध्वजारोहणाने होणार आहे. १५ व १६ एप्रिल रोजी 'परशुराम प्रीमियर लीग' नाईट व्हिजन (टर्फ ग्राउंड) स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. १७ एप्रिल रोजी महिलांसाठी नृत्य-नाटिका तसेच लहान मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता भगवान परशुराम चौक, खोलेश्वर येथून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून ती शहरातून मार्गक्रमण करून पुन्हा त्याच ठिकाणी समारोप होईल.



# ह्यूमन राईट जस्टीस असो.ने केला कर सहायक प्रिती उपरवट यांचा गौरव



**अकोला:** आपल्या जिद्द, चिकाटी व परिश्रमाने बिकट स्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत रित्या उत्तीर्ण होऊन शासनाच्या कर सहायक पदी नियुक्ती झाल्याबद्दल कु प्रीती अरुण उपरवट हिचा ह्यूमन राईट जस्टीस असो. नवी दिल्ली ने गौरव केला. असो.च्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी असो.चे जिल्हाध्यक्ष रवींद्र नंदकुमार गवई यांच्या पुढाकारात कु. प्रीती उपरवट हिच्या स्थानिक सागर कॉलनी येथील निवासस्थानी उपस्थित होऊन तिचा गौरव करून शुभेच्छा प्रदान केल्यात.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# 'बॅन्जो'च्या नावाखाली लावला डीजे

## डीजे साहित्य जप्त; पुसदमध्ये पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १३ एप्रिल




**यवतमाळ :** 'बॅन्जो'च्या नावाखाली डीजे बॉक्स लावून ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांवर पुसद शहर पोलिसांनी कडक कारवाई करत साईबाबा बॅन्जो अनसिंग यांच्याकडील डीजे साहित्य जप्त केले आहे. या कारवाईमुळे शहरात ध्वनीप्रदूषणाविरोधात पोलिसांनी घेतलेल्या भूमिकेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

महात्मा फुले जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी पुसद शहरात मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीदरम्यान नरेश खंडागळे यांनी 'बॅन्जो'च्या नावाखाली वाहनावर मोठ्या प्रमाणात डीजे बॉक्स लावून अत्यंत कर्णकर्कश आवाजात वादन केले. या आवाजामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला. तसेच ध्वनीप्रदूषण कायद्याचे उघड उल्लंघन झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

यापूर्वीही पुसद शहर पोलिसांनी डीजेच्या वाढत्या आवाजाबाबत गंभीर दखल घेतली असून, ठाणेदार सेवानंद वानखडे व उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांनी विविध बैठका घेऊन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती केली होती.

ध्वनीप्रदूषणामुळे हृदयविकाराचे झटके, बहिरेपणा यांसारख्या गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात, याची जाणीव करून देत नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष करून काही चालकांकडून नियमांचे उल्लंघन सुरूच असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधित डीजे साहित्य ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. आगामी काळातही अशा प्रकारच्या ध्वनीप्रदूषणाविरोधात कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक थोरात तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या सूचनेनुसार करण्यात आली.

# भीमजयंती : जड वाहनांना नो-एंट्री

## यवतमाळ शहरातील वाहतूक मार्गांमध्ये बदल

प्रतिनिधी १३ एप्रिल



**यवतमाळ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी शहरात मोठ्या प्रमाणात रॅली, शोभायात्रा व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष वाहतूक नियोजन जाहीर केले आहे.

सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत जड वाहने, ट्रॅव्हल्स बसेस तसेच इतर चारचाकी वाहनांना शहरात नियमित मार्गाने प्रवेश बंद राहणार आहे.

आर्णी रोडवरून नागपूर व चंद्रपूरकडे जाणारी वाहने वनवासी मारोती येथून वळविण्यात येतील. तसेच आर्णी रोडवरून अमरावतीकडे जाणाऱ्या वाहनांना भोयर बायपास मार्गे लोहारा चौकातून वळविण्यात येणार आहे. शहरात येणाऱ्या बसेससाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. आर्णी रोडवरून येणाऱ्या बसेस अंभ्यंकर शाळेसमोरील मार्गे बसस्थानकात प्रवेश करतील. अमरावती व दारव्हा रोडवरून येणाऱ्या बसेस लोहारा चौकातून दारव्हा रोडने शहरात येऊन भारत लॉजसमोरून आर्णी रोडवर जात अभ्यंकर कन्या शाळेसमोरील मार्गे बसस्थानकात जातील. नागपूर, पांढरकवडा व धामणगाव रोडकडून येणारी वाहने व बसेस धामणगाव बायपासमार्गे लोहारा चौकातून दारव्हा रोडने शहरात प्रवेश करतील व पुढे भारत लॉजसमोरून आर्णी रोडने अभ्यंकर कन्या शाळेसमोरील मार्गे बसस्थानकात जातील. घाटंजी व आर्णी भागातून येणाऱ्या बसेस वनवासी मारोती मार्गे आर्णी रोडने शहरात येऊन अभ्यंकर कन्या शाळेसमोरील मार्गे बसस्थानकात प्रवेश करतील.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला असून नागरिकांनी सहकार्य करून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# निम्न पैनगंगा प्रकल्पात गैरव्यवहाराचा आरोप

## आमदार राजू तोडसाम यांचे चौकशीचे आदेश

प्रतिनिधी १३ एप्रिल

**आर्णी :** निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील खडका तांडा येथे ग्रामपंचायत सचिव व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने सरकारी भूखंड स्वतःच्या पत्नीच्या नावावर केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची तक्रार समोर येताच आमदार राजू तोडसाम यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

खडका तांडा येथील मधुकर केरई यांनी सावळी सदोबा येथे आयोजित समाधान शिबिरात आमदारांकडे याबाबत तक्रार केली. त्यानंतर आमदारांनी उपस्थित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.तक्रारीनुसार, ग्रामपंचायतचे सचिव कैलास आडे यांनी पदाचा गैरवापर करत मोजणी अधिकाऱ्याशी संगनमत करून सरकारी जागा पत्नीच्या नावावर दाखवण्यासाठी खोटे कागदपत्र तयार केले. ही कागदपत्रे पाटबंधारे व भूसंपादन विभागाकडे सादर करण्यात आल्याचा आरोप आहे.

भूसंपादन प्रक्रियेदरम्यान १ एप्रिल २०२६ रोजी पाठविण्यात आलेल्या नोटिशीतून हा प्रकार उघडकीस आला. संबंधित जागांची ग्रामपंचायत नोंद नसतानाही ५० पेक्षा अधिक नोंदी पाठविण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

ते सध्या कापेश्वर येथे सचिव म्हणून कार्यरत असून तेथेही अशाच प्रकारचे गैरप्रकार केल्याची चर्चा स्थानिक स्तरावर होत आहे. तसेच माणूसधरी, बिलायता आदी गावांतही अशा प्रकारची प्रकरणे असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दरम्यान, निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या कामांमध्येही अनियमितता होत असल्याचे आरोप पुढे आले आहेत. ग्रामपंचायत कार्यालयात संबंधित मालमत्तेची कोणतीही अधिकृत नोंद आढळली नसल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सोलर ग्राहकांवर दुहेरी आर्थिक भार

## वीज खंडितीमुळे निर्मितीवर परिणाम

प्रतिनिधी १३ एप्रिल

**महागाव :** पर्यायी ऊर्जा आणि वाढत्या वीज बिलातून दिलासा मिळेल या अपेक्षेने लाखो रुपये खर्च करून सोलर पॅनेल बसवणाऱ्या महागावातील ग्राहकांना आता दुहेरी आर्थिक भार सहन करावा लागत आहे. महावितरणच्या वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे सौर ऊर्जा निर्मितीवर परिणाम होत असल्याचा आरोप ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून 'पीएम सूर्यघर' योजनेच्या माध्यमातून सौर ऊर्जेला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यानुसार अनेक नागरिकांनी कर्ज काढून किंवा बचत खर्चून घरांवर सोलर प्रकल्प उभारले आहेत.

> "लाखो रुपये खर्च करून सोलार बसवले, पण वीजच नसल्याने निर्मिती थांबते. मग या योजनेचा उपयोग काय?"
> - रफिक सय्यद, सौर ऊर्जा ग्राहक, महागाव

मात्र अपेक्षित लाभ न मिळाल्याने ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

सोलर प्रणालीच्या नियमानुसार वीजपुरवठा सुरळीत असताना तयार होणारी अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये जमा होते. मात्र महागाव परिसरात दिवसा, विशेषतः सूर्यप्रकाश तीव्र असताना वीज पुरवठा खंडित होत असल्याने निर्मिती थांबत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.

वीज खंडित होताच सोलर प्रणालीचे कार्य थांबते आणि तयार होणारी ऊर्जा वाया जाते. यामुळे एकीकडे बँक कर्जाचे हप्ते आणि दुसरीकडे नियमित वीज बिल असा दुहेरी आर्थिक फटका ग्राहकांना बसत आहे.

महावितरणने दिवसा सुरळीत वीजपुरवठा ठेवावा, जेणेकरून सौर ऊर्जेचा लाभ ग्राहकांना मिळू शकेल, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# डोळे तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर

प्रतिनिधी १३ एप्रिल

**पुसद :** फुलसावंगी येथील ज़िया मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भव्य मोफत डोळे तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या अकरा वर्षांपासून सुरू असलेला हा सामाजिक उपक्रम यंदाही मोठ्या उत्साहात राबविण्यात येणार आहे.

या शिबिरात नागपूर व अमरावती येथील नामांकित नेत्रतज्ज्ञांकडून रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. तसेच गरजू रुग्णांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे.

हे शिबिर गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे ठिकाण जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळेचे पटांगण, बस स्टँडजवळ, फुलसावंगी (ता. महागाव) येथे निश्चित करण्यात आले आहे. आतापर्यंत शेकडो रुग्णांनी या उपक्रमाचा लाभ घेतला असून अनेकांना दृष्टीचे नवे जीवन मिळाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध लढा अद्याप कठीणच

## कायद्याची अंमलबजावणी ढिसाळ असल्याची टीका

प्रतिनिधी १३ एप्रिल

**झरी जामणी :** देश आधुनिकतेकडे झपाट्याने वाटचाल करत असला तरी समाजातील काही गंभीर प्रश्न अद्यापही कायम असल्याचे चित्र आहे.

विशेषतः कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असून, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

पुरुषप्रधान मानसिकता, जुन्या परंपरा आणि स्त्रीला दुय्यम मानण्याची प्रवृत्ती यामुळे अनेक महिलांना कुटुंबात सन्मानाचे स्थान मिळत नसल्याचे वास्तव पुढे येत आहे. हुंड्यासाठी छळ, मानसिक व शारीरिक अत्याचार तसेच आर्थिक शोषणाच्या घटना अजूनही समाजात दिसून येत आहेत. बहुतांश प्रकरणे घराच्या चार भिंतीत घडत असल्याने पुरावे मिळणे आणि गुन्हे सिद्ध करणे कठीण ठरत आहे.

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अस्तित्वात असतानाही दोषसिद्धीचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब, साक्षीदारांचा अभाव आणि कौटुंबिक दबावामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित राहतात किंवा तडजोडीत संपतात. त्यामुळे पीडित महिलांना न्यायाऐवजी निराशेला सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, काही ठिकाणी कायद्याचा गैरवापर होत असल्याच्या चर्चेमुळे संपूर्ण कायद्याबाबत गैरसमज निर्माण होतो, मात्र प्रत्यक्षात गंभीर अत्याचार प्रकरणांमध्ये कठोर कारवाईची गरज अधोरेखित होत आहे. तज्ज्ञांच्या मते, कायद्याची कडक अंमलबजावणी आणि न्यायप्रक्रियेची गती वाढविणे अत्यावश्यक आहे.

अन्यथा, संविधानातील समानतेचा मूलभूत तत्त्वांचा प्रभाव समाजात अपेक्षित पातळीवर दिसणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

पीडित महिलांनी न घाबरता कायदेशीर मार्गाने लढा सुरू ठेवावा, तसेच समाज, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेने एकत्रितपणे पुढे येण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# शिरपुर येथे आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यान



प्रतिनिधी १३ एप्रिल

**यवतमाळ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त शिरपुर येथे आयोजित प्रबोधनपर व्याख्यान कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पहिले पुष्प उपासक वैशाख मंजुळा वसंत वाहुरवाघ, तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, आर्णी यांनी अर्पण केले.

यावेळी वाहुरवाघ यांनी भगवान बुद्धांच्या धम्माचे आचरण मन व शरीरासाठी कसे उपयुक्त ठरते यावर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला धम्म आणि संविधान दैनंदिन जीवनात कसे अंगीकारावे, याबाबत त्यांनी उपस्थितांना सविस्तर प्रबोधन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरपुरचे माजी सरपंच परशराम राठोड होते. प्रमुख अतिथी म्हणून जवळा येथील करमरकर, उमरी पठार येथील पांडुरंग हिरगुडे तसेच संमोहन तज्ञ नवनाथ गायकवाड उपस्थित होते.

व्याख्याते वाहुरवाघ यांचे स्वागत संजय उमरे यांनी शॉल देऊन, सुभाषचंद्र पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन तर भाऊसाहेब अत्रे यांनी स्मृतिचिन्ह देऊन केले. अध्यक्ष परशराम राठोड यांचे स्वागत सुभाषचंद्र पाटील यांनी केले. करमरकर, पांडुरंग हिरगुडे आणि नवनाथ गायकवाड यांचेही मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास शिरपुर, उमरी पठार व जवळा परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मांगीलाल पवार यांनी केले.

# भाजपची महत्त्वपूर्ण बैठक; 'मन की बात' बूथस्तरावर राबविण्याचा निर्धार

प्रतिनिधी १३ एप्रिल




**यवतमाळ :** भारतीय जनता पार्टीच्या यवतमाळ व पुसद जिल्हा संघटनांच्या वतीने SIR, 'मन की बात' तसेच 'सरल ॲप' या विषयांवर आधारित महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत आगामी संघटनात्मक उपक्रम, बूथस्तरावरील अंमलबजावणी आणि जनसंपर्क अधिक बळकट करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीस प्रदेशातून नियुक्त जिल्हा प्रभारी दिनेश सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच माजी मंत्री मदन येरावार, माजी आमदार अण्णासाहेब पारवेकर, नितीन भुतडा, राजू पडगिलवार, रेखाताई कोठेकर (जिल्हा सरचिटणीस, यवतमाळ) आणि आदित्य माने (जिल्हा सरचिटणीस, पुसद) यांची उपस्थिती होती.

बैठकीत 'मन की बात' कार्यक्रम प्रत्येक बूथपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या माध्यमातून जनतेशी थेट संवाद साधत शासनाच्या विविध योजनांची माहिती अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले. येत्या २६ एप्रिल रोजी पुसद जिल्हा क्षेत्रातील सर्व बूथवर 'मन की बात' कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते सज्ज असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# मुकूटबन ग्रामपंचायतीची चौकशी अर्धवट

## जिल्हा स्तरीय समिती माघारी परतल्याने प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १३ एप्रिल




**झरी जामणी :** तालुक्यातील मुकूटबन ग्रामपंचायतीविरोधातील तक्रारींच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने दिलेल्या चौकशी आदेशानुसार गुरुवारी (९ एप्रिल) जिल्हा स्तरीय समितीने ग्रामपंचायत कार्यालयात प्रत्यक्ष तपासणी केली. मात्र दिवसभर चाललेल्या या चौकशीत केवळ २०२३ पर्यंतचे अभिलेख तपासण्यात आल्याने संपूर्ण चौकशी अर्धवट राहिल्याचे समोर आले आहे.

लोकशाही दिनी दाखल झालेल्या तक्रारींनंतर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार सकाळी सुमारे ११ वाजता समिती मुकूटबन ग्रामपंचायत कार्यालयात दाखल झाली. यावेळी विस्तार अधिकारी (पंचायत), सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी तसेच तक्रारदार उपस्थित होते. चौकशीदरम्यान मार्च २०२६ पर्यंतची सर्व कागदपत्रे तपासली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत केवळ २०२३ पर्यंतचेच दस्तऐवज तपासण्यात आले. त्यानंतर समितीने पुढील तपासणी न करता माघार घेतल्याने चौकशीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकारामुळे उर्वरित अभिलेखांची तपासणी कधी होणार, तसेच ग्रामपंचायतीतील आर्थिक व्यवहार, योजनांची अंमलबजावणी आणि निर्णय प्रक्रियेतील अनियमितता यांची सखोल चौकशी होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, चौकशी पूर्ण न झाल्यास उपोषणाला बसण्याचा इशारा तक्रारदार बबिता मुद्दमवार यांनी दिला आहे.

# जनगणनेसाठी फिल्ड ट्रेनर्सना प्रशिक्षण

प्रतिनिधी १३ एप्रिल

**यवतमाळ :** आगामी जनगणना २०२७ ही व्यापक व यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६ ते ११ एप्रिल २०२६ या कालावधीत फिल्ड ट्रेनर यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, तहसीलदार विद्या शिंदे, जनगणना संचालनालयाचे मास्टर ट्रेनर सहाय्यक संचालक प्रविण भगत, सांख्यिकी अन्वेषक विशाल दिवेकर, जिल्ह्याचे मास्टर ट्रेनर तहसीलदार राहुल मोरे, एकनाथ बिजवे तसेच जिल्हा समन्वयक जतिन माहेश्वरी उपस्थित होते. याशिवाय चार्ज स्तरावरील अधिकारी व कर्मचारी फिल्ड ट्रेनर म्हणून सहभागी झाले होते. प्रशिक्षणादरम्यान जनगणनेच्या प्रत्येक टप्प्यावर संबंधित अधिकारी व फिल्ड ट्रेनर यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली. घर यादी व घर गणना प्रभावीपणे राबविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मोबाईल ॲपचा वापर, नागरिकांकडून माहिती संकलन करताना विचारावयाच्या प्रश्नांची योग्य हाताळणी, तसेच संकलित माहिती अचूकपणे मोबाईल ॲपवर अपलोड करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी माहितीची अचूकता, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, माहितीची गोपनीयता आणि निर्धारित वेळापत्रकानुसार कामकाज यावर विशेष भर देण्यात आला. तसेच मोबाईल ॲपमध्ये येणाऱ्या संभाव्य अडचणींवर उपाययोजना करण्याबाबत मास्टर ट्रेनर्सनी सखोल मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने जनगणनेचे काम अचूक, पारदर्शक व गांभीर्याने करण्याच्या जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सूचना दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी जनगणनेसाठी अचूक माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन केले.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## आज विभागीय महिला लोकशाही दिन

**अमरावती:** महिला व बालविकास विभागाच्या ४ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा यादृष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्यासग्रस्त, पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार येत्या सोमवारी दि. १३ एप्रिल रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्तस्तरावर, तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय तर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरावर तहसील कार्यालय या ठिकाणी माहिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो.

# डिजीटल प्रणालीवर आधारित लोकाभिमुख प्रशासन निर्माण करणार - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## ◆ अमरावती शहर पोलीस दलाच्या ताफ्यात ३० नवीन वाहने दाखल; पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती:** शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक लोकाभिमुख आणि वेगवान करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, अमरावती शहर पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ३० नवीन अत्याधुनिक वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. अमरावती शहर हे राज्याचे महत्त्वाचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र असून, वाढत्या शहरीकरणानुसार सुरक्षिततेचे आव्हान पेलण्यासाठी शासन डिजिटल प्रणालीवर आधारित आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यावर भर देत आहे. ही नवीन अत्याधुनिक वाहने यात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी तसेच गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी अमरावती शहर पोलीस दलाच्या ताफ्यात ३० नवीन



अत्याधुनिक वाहने दाखल झाली आहेत. या वाहनांचे लोकार्पण आज पोलीस आयुक्त कार्यालयात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते संपन्न झाले. अमरावती शहर पोलीस दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून या ३० नवीन वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. या वाहनांमुळे पोलिसांना गुन्ह्यांच्या ठिकाणी तत्परतेने पोहोचणे आणि गस्त घालणे अधिक सुलभ होणार आहे.

या सोहळ्याला आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, प्रवीण पोटे-पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, अमरावती शहर हे शिक्षणाचे, संस्कृतीचे केंद्र आहे. येथे गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. बदलत्या काळानुसार गुन्हेगारीचे स्वरूप बदलत असून सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. हे आव्हान पेलण्यासाठी शासन डिजिटल प्रणालीवर आधारित आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यावर भर देत आहे. शहर अधिक सुरक्षित करण्यासाठी संपूर्ण अमरावतीत सीसीटीव्ही सर्वेलन्सचे जाळे विणले जाईल. यामुळे अवैध धंदे करणारे समाजकंटकांवर चाप बसणार आहे.

पोलिसांनी संवेदनशील ठिकाणांची यादी तयार करून तिथे विशेष बंदोबस्त ठेवावा. तसेच, 'पोलीस मित्र' संकल्पना राबवून सुरक्षिततेचा आढावा घ्यावा. महामार्गावर गोवंश तस्करी रोखण्यासाठी सुरक्षा वाढवण्याचे आणि रात्रीच्या वेळी दुचाकीवरून गोंधळ घालणाऱ्यांवर कडक कारवाई करा. प्रसारमाध्यमे ही समाजाचा आरसा आहेत. प्रसारमाध्यांमध्ये प्रसारीत होणाऱ्या बातम्यांवर त्वरित कार्यवाही करा. बातम्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती प्रसारमाध्यमांना द्या, असे निर्देश पालकमंत्री श्री. बावनकुळे त्यांनी यावेळी दिले.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी तर आभार पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी मानले.

## अमरावतीत गुन्हे शाखेने जुगार पकडला

प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती:** गुन्हे शाखेने जुगार अड्ड्यावर धाड टाकून जुगार खेळणारे जुगारी ताब्यात घेतले आहे.ही कारवाया आज कमीला ग्राउंड नजीक करण्यात आली. अमरावती शहर गुन्हे शाखेचे पथक अवैध व्यवसायावर कार्यवाही करणेसाठी पोलीस स्टेशन नागपुरी गेट हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, कमिला ग्राउंड जवळील अब्दुल जहीर यांचे घराजवळील खुल्या जागेत काही इसम एक्का -बादशाहा नावाच्या जुगार पत्त्यावर पैशाने हार जीतीचा खेळ खेळत आहे. अशा माहितीवरून दोन पंचासह रेड केली असता आरोपी असत खान अमीन उल्ला खान व ४८ राहणार



गवळीपुरा, शेख इरफान शेख हपीज ३७ वर्ष राहणार कमीला ग्राउंड, सय्यद मेहबूब सय्यद हसन ३७ वर्ष राहणार अकबर नगर, मोहम्मद सईद मोहम्मद इकबाल वय ३६ वर्ष राहणार कमला ग्राउंड, शेख जुनेद शेख फरीद वय ४३ वर्षे राहणार रहमत नगर, गफ्फार खा उस्मान खा ६५ राहणार नलसापुरा, अलीएजाज आली उस्मान वय ५० राहणार गुलिस्ता नगर, अब्दुल फाईन अब्दुल करीम वय ४५ राहणार हबीब नगर, शेख साबीर शेख हबीब राहणार कमला ग्राउंड, अजय अरुण नाईक ३० वर्ष राहणार शेगाव झोपडपट्टी असे मिळून आल्याने त्यांची अंग झडती घेतली असता त्यांच्याजवळ रोख २३,२६५/ज् रुपये व ५२ ताशपत्ते अंदाजे रक्कम ५० रु असा एकूण २३, ३१५/ज् रुपयाचा मुद्देमाल पंचा समक्ष ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे पोस्टे नागपुरी गेट येथे गुन्हा दाखल केला आहे.

## 'एकता रॅली'; डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती :** एकता रॅली आयोजन समिती, अमरावती यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, कॅम्प रोड, अमरावती येथे सकाळी ११:०० वाजता या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. अशी माहिती पार पडलेल्या पत्र परिषदेमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकुमार उर्फ लप्पी भैया जाजोदिया यांनी दिली.

पत्र परिषदेच्या व्यासपीठावर एकतरली आयोजन समितीचे मुख्य संयोजक समाज भूषण नन्नावरे, निमंत्रक राष्ट्रीय नेते बीजेएस




सुदर्शन जैन, समिती अध्यक्ष संचालक घरकुल मसाले चे संचालक तुषार वरणगावकर,

ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर गोविंद कासट, डॉक्टर गोपीचंद मेश्राम, अरुण कुमार आठवले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

सदर मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक तथा समिती अध्यक्ष चंद्रकुमार जाजोदिया राहणार आहेत. सत्कारमूर्ती म्हणून पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे उपस्थित राहणार आहेत.

विशेष अतिथी म्हणून अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परिक्षेत्र रामनाथ पोफळे, पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष तुषार वरणगावकर, कार्याध्यक्ष सुदर्शन जैन , निमंत्रक अरुण कुमार आठवले राहणार आहेत. कार्यक्रमात ३५ भीमकन्यांचे नृत्य सादरीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन, दीप प्रज्वलन, संविधान वाचन, तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. 'हम भीम के दिवाने' या ग्रुपद्वारे हिंदी/मराठी भीम गीत, गझल व कव्वाली सादर केली जाणार आहे. तसेच 'स्माईल' हे एकल नाटक सादर होणार आहे.

यावेळी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना ङ्कविश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरङ्ख जीवन गौरव, साहित्यरत्न, राजपत्रित अधिकारी गौरव, वैद्यकीय सेवा रत्न, उद्योग रत्न, शिक्षण/कला/क्रीडा/सांस्कृतिक रत्न, पत्रकारिता गौरव व समाजरत्न पुरस्कार २०२६-२७ प्रदान करण्यात येणार आहेत. यात पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, डॉ. अनंता सुर, डॉ. नितीन अ. कोळी, डॉ. उज्वल र. मोहोड, डॉ. अक्षय ढोरे, मनोजकुमार पुरसवाणी जैन, शंकर ह. शरणपाळे, प्रा. दीपक लोखंडे, अशोकभाई जोशी, दिनेश वाघमारे, श्रीराम बनसोड यांचा समावेश आहे. कार्यक्रमात समाजभूषण राजुजी नवारे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मान्यवर, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## माताफैल येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त जनजागृती प्रदर्शनी

प्रतिनिधी | १३ एप्रिल

### ◆ चवदार तळे सत्याग्रह पत्रक वाटप कार्यक्रम उत्साहात

**बडनेरा:** माताफैल, जुनी वस्ती (बडनेरा) येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बडनेरा शहर शाखा यांच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन सभा, जनजागृती प्रदर्शनी तसेच चवदार तळे सत्याग्रह पत्रक वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. समाजमंदिर येथे आयोजित या कार्यक्रमाला महिलांची लक्षणीय उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते तथा आंबेडकर विचारांचे विद्यार्थी मा. महादेव मेश्राम होते. प्रास्ताविक मा. दिलीप लाडे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. विजय डवरे (जिल्हा



प्रधानसचिव, महा. अनिस, अमरावती) यांनी महिलांनी अंधश्रद्धेला बळी न पडता फुले-शाहू-आंबेडकर विचार स्वीकारून विज्ञाननिष्ठ व विवेकशील राहण्याचे आवाहन केले. तसेच मा. विजया घोडेस्वार यांनी महिलांनी गावागावात संघटन उभे करून शाखा सुरू करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी मा. प्रफुल मंदा यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याचा आढावा घेत महिलांनी भविष्यात सक्रिय भूमिका बजावावी, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला.

प्रमुख उपस्थिती म्हणून सरिता लाडे (सदस्य, अमरावती शहर वस्तीस्तर संघ), नूतन वासनिक (महा. अनिस, बडनेरा शहर), रेहमत शहा (अध्यक्ष, महा. अनिस, बडनेरा शहर) यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान महात्मा फुले, समता चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन आणि संविधान मूल्यांवर आधारित जनजागृती प्रदर्शनी लावण्यात आली होती. तसेच चवदार तळे सत्याग्रहाविषयी पत्रकांचे वाटप करून जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाला उमा इंगोले, रमा मोहोड, वाघमारे ताई, कुमुद मेश्राम, मोनाली तायडे, जयश्री गवळी, सुरेखा तायडे, वृंदा आगलावे, मनाली श्रीवास्तव, राणी बागडे, स्मिता सुखदेवे, सीमा काळे, नीता इंगळे, सरिता इंगळे, किरण ताई वाघमारे, सारिका राहुल, किरण ताई दुपारे, रंजना भजगवरे, सोनाली इंगळे, माधुरी वानखडे, सुनिता वानखडे, अर्चना कैथ्वास आदींसह शहरातील अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली राऊळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनुपमा गोंडाने (अध्यक्ष, संकल्प वस्तीस्तर संघ) यांनी केले. या कार्यक्रमासाठी संविधान जागर अभियान, महिला बचत गटांचे संकल्प, सावित्री, लोकसेवा, जनसेवा, बुद्धछाया वस्तीस्तर संघ तसेच क्रांती नवनिर्मिती राष्ट्रीय संघटन यांचे सहकार्य लाभले. 'समता, विज्ञाननिष्ठा आणि संविधान' या मूल्यांचा प्रभावी संदेश देणारा हा कार्यक्रम समाजप्रबोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व अखंड नामजप यज्ञ प्रारंभ

प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती:** श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे सुरू असलेल्या अखंड नामजप यज्ञात पुरुष ,महिला ,विद्यार्थी, मुले ,मुली बसलेले आहेत. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या या सप्ताहात सकाळी औदुंबर प्रदक्षिणा, यज्ञ मंडपातील रोजचे कर्म, भूपाळी आरती ,श्री स्वामी महाराजांच्या मूर्तीचे षोडशोपचारे पूजन व अभिषेक, नैवेद्य आरती (मंत्र पुष्पांजली सह) दुर्गा सप्तशती व



स्वामी सारामृताचे पारायण, प्रश्नोत्तरे, हस्तरेषा, जन्मकुंडली पाहणे, प्रश्न सोडवणे, वास्तुशास्त्रावर मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम ,गीताई मनाचे श्लोक वाचन ,सायंकाळी औदुंबर प्रदक्षिणा, आरती, मार्गदर्शन, सायंकाळची नित्यसेवा, गीतेचा पंधरावा अध्याय, विष्णुसहस्त्रनाम रामरक्षा वाचन दररोज सुरू असून या कार्यक्रमात शहरातील तसेच ग्रामीण भागातील महिलां मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या आहेत.

## जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटनेची सभा संपन्न

प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती :** १२ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटनेची सर्वसाधारण सभा सोलापूर येथे यशस्वीरीत्या पार पडली. सभा सुरु करण्यापूर्वी दिवंगत लिपिक नेते विवेक लिंगराज यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सभेची कार्यवाही सुरु करण्यात आली.




सदर सभेला राज्याध्यक्ष मा. श्री सागरजी बाबर, राज्य कार्याध्यक्ष पंकजजी गुल्हाने, राज्य कोषाध्यक्ष मा. श्री उमाकांतजी सूर्यवंशी तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेमध्ये लिपिक संवर्गाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये लिपिकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करणे, पदोन्नतीच्या स्तरांमध्ये कपात करणे, स्पर्धा परीक्षेसाठी असलेली ७ वर्षांची अट शिथिल करून ती ३ वर्षे करण्याबाबत मागणी, दरवर्षी राज्य संमेलन आयोजित करणे, अपघात विम्याची मर्यादा १५ लाखांवरून ५० लाखांपर्यंत वाढविणे, तसेच लिपिक संवर्गातून वर्ग-२ पदासाठी पदोन्नतीचा कोटा १५ टक्क्यांवरून ४० टक्के करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सांगली येथे होणाऱ्या राज्य अधिवेशनाच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली असून संघटना अधिक बळकट करण्यासाठी लढा निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

सभेदरम्यान विविध जिल्ह्यांतील लिपिकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी राज्याध्यक्ष, कार्याध्यक्ष व कोषाध्यक्ष यांनी कर्मचाऱ्यांच्या शंकांचे समाधान करून त्यांचे प्रबोधन केले.

सदर सभेस अमरावती जिल्ह्यातून पंकज गुल्हाने (राज्य कार्याध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष), हेमंत कुमार यावले (राज्य प्रसिद्धी प्रमुख), संजय राठी (जिल्हा सचिव) तसेच विजय कोठाळे (जिल्हा सहसचिव) उपस्थित होते. अशी माहिती संजय राठी जिल्हा सचिव महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटना अमरावती यांनी दिली.

## ऐन उन्हाळ्यात एसटी प्रवास भाड्यात हंगामी भाडेवाढ

### ◆ अमरावती विभागाकडून साध्या बसच्या भाड्यात १० टक्के वाढ

प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती:** उन्हाळी सुट्ट्या, सण-उत्सव आणि लग्नसराईच्या काळात होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने साध्या बसच्या भाड्यात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ १५ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्रीपासून लागू होणार असून १५ जून २०२६ पर्यंत कायम राहणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने महामंडळाला गर्दीच्या काळात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची मुभा दिली आहे, त्याअंतर्गत अमरावती विभागाचे सक्षम प्राधिकारी यांनी ही १० टक्के दरवाढ मंजूर केली आहे.

या निर्णयामुळे साध्या बसचा सध्याचा १०.०५ रुपये प्रति टप्पा दर आता ११.०५ रुपये इतका होईल. अमरावती येथून विविध महत्त्वाच्या शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना आता जास्तीचे पैसे मोजावे लागणार आहेत. सुधारित दरपत्रकानुसार, अमरावती ते नागपूर प्रवासासाठी आता २९० रुपये (आधी २६२), अमरावती ते धारणी २६८ रुपये (आधी २४२) आणि अमरावती ते अकोला १९१ रुपये (आधी १७२) मोजावे लागतील. तसेच परतवाडा, दर्यापूर आणि मोर्शी या मार्गांसाठी ९१ रुपयांऐवजी १०२ रुपये भाडे आकारले जाईल. महत्त्वाची बाब म्हणजे ही भाडेवाढ केवळ 'साध्या बस' प्रकारासाठीच लागू असून, महामंडळाच्या इतर प्रगत सेवांचे दर पूर्वीप्रमाणेच स्थिर राहणार आहेत. प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन महामंडळाला सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती विभागाचे नियंत्रक सचिन डफळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## हातभट्टीची दारू पकडली



प्रतिनिधी | १३ एप्रिल

**अमरावती :** १३ एप्रिल रोजी पोस्टे फ्रेजरपुरा हद्दी मध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरून आरोपी वासुदेवराव तुकाराम श्रीनाथ वय ६० वर्ष, रा भुईपुरा ,वडाळी अमरावती हा राहत्या घरासमोरील आवारातङ्हात भट्टी दारू काढताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडून हात भट्टी दारू १०० लिटरङ्व मोहाचा सडवा २०० लिटर ङ आणि इतर साहित्य जागीच नष्ट केले.असा एकूण ७५,००० रु मुद्दे माल जप्त करण्यात आला असून त्यांचे विरुद्ध पो.स्टे.फ्रेजरपूरा येथे कलम ६५(क)(फ)(ड) म.दा.का. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# अवैध उत्खननाचा साधतात मोका, भूकंपाचा वाढला धोका !




**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

***वाशीम जिल्ह्यात अवैध उत्खनानाला महसूल प्रशासनाचा हातभार**
***रॉयल्टी चोरीतून अधिकारी व खदान मालक मालामाल**








अल्पावधीमध्ये कोट्यधीश व्हायचं असेल तर गौण खनिजाचा व्यवसाय करायचा, 'या' व्यवसायातून रॉयल्टी चोरीच्या पैशात महसूल विभागातील सर्व जबाबदार अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांचा ठरलेला 'हिस्सा' वाटायचा आणि उर्वरित पैसा स्वत: ठेवायचा असा हा अफलातून आणि झटपट श्रीमंत होण्याचा सोप्पा व्यवसाय आहे. या व्यवसायात प्रामुख्याने विविध राजकीय आणि प्रादेशिक पक्षाचे आजी, माजी पदाधिकारी व साहेबांची निष्ठा बाळगणारे ठराविक कार्यकर्ते यांची मक्तेदारी दिसते.

विदर्भ- मराठवाड्याच्या सिमेवर असलेल्या पैनगंगा नदीच्या पात्रात रेती (वाळू) चे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू आहे. त्यानंतर राजगाव पासून तोंडगाव, सायखेडा, अंजनखेडा, बोराळा भागात गौण खनिजाचे मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या अवैध उत्खनाने वाशीम परिसराला भूकंपाचे हादरे बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.शुक्रवार १० एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजताच्या दरम्यान हिंगोली परिसरात आणि वाशीमच्या पंचक्रोशित काही भागात भूंकपाचा हादरा बसल्याने भविष्यात पुन्हा भूकंपाचा हादरा बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.आता या गंभीरबाबीकडे महसूल प्रशासन कोणती भूमिका घेणार ? की पुन्हा 'या' व्यवसायात भागिदारी ठेवून झटपट कोट्यधीश होण्यासाठी पुढाकार घेणार ? अशी चर्चा जनतेमध्ये सुरू आहे. वाशीम परिसरासह जिल्ह्यात गौण खनिजाच्या व्यवसायात झपाट्याने वाढ झाल्याचे दिसते. एकदा परवाना मिळाल्यानंतर परवान्यात नमूद असलेल्या जागेवर मशीनरी दाखवून त्या गावातील सरकारी मालकीच्या ई, एफ वर्गवारीच्या जमिनीवर जेसीबी चालवून शासनाच्या तिजोरीत जमा होणाऱ्या 'रॉयल्टी' च्या रक्कमेच्या चोरीला प्रारंभ होतो.ही चोरी सुरू असल्याची माहिती महसूल विभागातील गावकोतवाल, तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार , उपविभागीय अधिकारी ,खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडे असते.महसूल प्रशासनातील जबाबदार अधिकारी संबंधित खदान मालकावर कारवाई करण्यासाठी घटनास्थळावर जातात.त्याठिकाणी पोहोचल्यानंत गौण खनिजाचे मोजमाप सुरु झाल्यानंतर खदान मालक आणि भ्रष्ट अधिकारी यांचे मनोमिलन होवून भागिदारीला प्रारंभ होतो.शासनाचे रखवालदारच संगनमताने चोरी करत असतील शासनाची तिजोरी कशी भरणार ? अशीही जाणकारांमध्ये चर्चा आहे. वाशीम तहसीलमध्ये तहसीलदाराचा प्रभार मागील तिन आठवड्यापासून एका परिविक्षाधीन सनदी अधिकाऱ्याकडे असल्याने वाशीम तहसीलमधील अनेक अर्थपूर्ण संबंधातील कामांना ब्रेक लागल्याची महसूल विभागात चर्चा आहे. परिविक्षाधीन सनदी अधिकारी यांच्या निदर्शनास गौण खनिज चोरीची बाब लक्षात आल्यानंतर वाशीम तालुक्यातील खदानमालकांचे खुलेआम सुरू असलेले गौण खनीजाचे उत्खनन अचानकपणे बंद पडल्याचे समजते. भविष्यातील भूकंपाचे धोके निर्माण होवू नयेत यासाठी महसूल प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांनी वाशीम तालुक्यातील सर्व गौण खनिज खदानीची ड्रोणद्वारे चौकशी करावी, दोषींकडून शासनाचा कोट्यवधीचा दंड व्याजासह वसूल करण्यासाठी पुढाकार घेवून गौण खनिजाचे सुरु असलेले अवैध उत्खनन कायमस्वरूपी बंद करावेअक्षी जनतेची मागणीप्राहे.

## थोडक्यात

### समृद्धी महामार्गावर अपघात

**अपघातात दीड वर्षाच बाळ सुखरूप**

**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**

प्राप्त माहितीनुसार दिनांक १२/४/ २०२६ रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास मुंबईवरून अमरावती साठी समृद्धी महामार्ग जात असताना लोकेशन



क्रमांक १५९ वर अज्ञात वाहनाच्या धडकेत कारचा भीषण अपघात होऊन त्यामध्ये कारचालक श्याम देशमुख वय ४२ वर्ष गंभीर तर त्यांची पत्नी जयश्री देशमुख वय ३८ वर्ष रा.अमरावती या किरकोळ जखमी झाल्या अपघाताची माहिती मिळताच समृद्धी महामार्ग १०८ रुग्णवाहिकेचे पायलट अतिश चव्हाण व डॉक्टर निलेश राठोड घटनास्थळी जाऊन जखमी रुग्णाला कारंजा उपजिल्हा रुग्णालयाचे दाखल केले.त्यावेळी तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सागर मस्के यांनी प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी अमरावती रेफर केले.

त्यावेळी मदत साठी कक्षा सेवक विजय शिरसाठ समृद्धी रुग्णवाहिकेचे अजय घोडेस्वार व श्री.गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख घटना त्यावेळी एचएसपी पोलीस दल व अग्निशामक दल समृद्धी महामार्ग कारंजा येथे प्रामुख्याने घटनास्थळी दाखल होते.

### श्री संत रविदास फाउंडेशनचा कार्यारंभ सोहळा

**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**

सामाजिक कार्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या श्री.संत रविदास फाउंडेशन या रजिस्टर्ड धर्मादायी संस्थेचा उद्घाटन व प्रथम कार्यारंभ म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा कारंजा येथे



मंगळवार १४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील अलका बिल्डिंग जवळच्या नूतन सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नागपूर येथील मॉरिश कॉलेजचे माजी संचालक प्रा.डॉ.भाऊ दायदार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके ह्या उद्घाटक म्हणून उपस्थित असतील तर प्रमुख अतिथी म्हणून गुरु रविदास चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे व गुरु रविदास विश्व महापीठचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष वसंतराव धाडवे उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान या कार्यक्रमाला नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री संत रविदास फाउंडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर घुडे, उपाध्यक्ष खुशाल राजगुरे, सचिव महादेव अंबाळकर, कोषध्यक्ष मधुकर सोनटक्के, सदस्य गजानन राजगुरे, ज्ञानेश्वर अंबाळकर, बाबाराव वानखडे, कैलास ठोसरे, रविंद्र इंगळे यांनी केले.

## वाहक-चालक सवलतीला त्रासले...

# लालपरीला समस्यांनी ग्रासले!

**प्रथमोपचार पेट्या गायब...**

लाल परी मध्ये प्रवास करत असताना कुठे अपघात झाला, तर प्रवाशासह चालक वाहकावर प्रथमोपचार करण्यासाठी चालकाच्या केबिनमध्ये प्रथमोपचार पेट्या बसविल्या होत्या. त्या पेट्याही एसटी मधून गायब झाल्या आहेत. तसेच त्यातील साहित्य बेपत्ता झाल्याचे दिसून आले आहे..

**● दिपक मापारी @ रिसोड ●**

प्रवाशांच्या सेवेसाठी असे ब्रीद घेऊन राज्यात जनतेच्या सेवेसाठी लाल परी रस्त्यावर धावत आहे. त्यात आता नुकतीच शासनाने महिलांकरिता तिकिटामध्ये ५० टक्के सवलत दिली असल्याने महिला प्रवासी संख्या वाढली असल्याचे दिसून येत आहे. मात्र अलीकडे राज्यात लालपरी म्हणजे एसटी बसेस अचानक रस्त्यात बंद पडणे, ब्रेक फेल होणे, स्टेरिंग रॉड तुटणे आग लागणे यासारख्या घटना वाढल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या बस स्थानक व आगारांमध्ये बसेसची पाहणी नागरिकांनी केली असता या पाहणीत एसटीची बाहेरूनच नव्हे, तर आतूनही दुरावस्था झाल्याचे दिसून आले. अनेक एसटी बस मधील अग्निशमन यंत्र गायब असल्याने लाल परी असुरक्षित

**प्रवाशांना सहन करावा लागतो मनस्ताप**

असल्याचा प्रकार समोर येत आहे. एसटीचा प्रवास या सुरक्षित प्रवास असे बिद्र वाक्य घेऊन शहरापासून धावणारी गाव खेड्यापर्यंत राज्य परिवहन महामंडळाची लाल परी खऱ्या अर्थाने लोकवाहिनी ठरली ; मात्र नादुरुस्त आणि खिळ खिळया झालेल्या बसेस सोई सुविधांच्या अभावामुळे आता लाल परीचा प्रवास सुरक्षित ठरवू लागला आहे. महामंडळाच्या बसेस मध्ये असलेली अग्निशमन यंत्रेही बेपत्ता झाली आहेत. याकडे महामंडळाचे दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आल्याचे चित्र आहे. आता उन्हाळा सुरू झालेला आहे. उन्हाळ्यात पारा वाढत सर्वाधिक नागरिक राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसने प्रवास करतात. त्यामुळे बसेस मध्ये अग्निशमन यंत्राची सुविधा आहे की याबाबत बसेसची पाहणी केली. तेव्हा धोकादायक प्रकार समोर आला. अनेक बसेस मध्ये अग्निशमन यंत्र नसल्याचे दिसून आले आहे. अग्निशमन यंत्र बसविण्याकडे महामंडळाचे दुर्लक्ष होत आहे. तरी सर्व सामान्य प्रवासी लालपरीतच प्रवास करत असल्याचे दिसून येत आहे. तरी सर्व सामान्य प्रवासी लाल



परीनेच प्रवास करीत असतात. त्यामुळे प्रवाशांच्या सुविधेच्या दृष्टिकोनातून राज्य परिवहन महामंडळाने लक्ष देण्याची गरज आहे.

## आला उन्हाळा आरोग्य सांभाळा !



**उष्मालाटेपासून बचावाच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता**

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

एप्रिल २०२३ पासून ते जुन २०२३ पर्यंत तापमानात वाढ होण्याची शक्यता वेधशाळेने वर्तविली आहे. उष्माघातामुळे होणारे मृत्य टाळण्याकरीता व उष्माघात होऊ नये याकरीता करावे व काय करु नये. याबाबतची जनजागृती प्रत्येक गावामध्ये स्थानिक वैद्यकीय अधिकारी व सामुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्ती यांच्यामार्फत आरोग्य शिक्षण देऊन स्थानिक लोकांचा सहभाग घेऊन आरोग्य शिक्षणाव्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

उन्हाळयामध्ये नागरीकांनी उष्मालाटेपासुन बचाव होण्याच्या दृष्टीने काय करू नये याबाबत घ्यावयाची दक्षता घ्यावी. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर पडू नये. बाहेर जाणे टाळावे. दारु, चहा, कॉफी आाणि कार्बोनेट थंड पेय पिऊ नये. ऊन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करणे टाळावे. स्वयंपाक घराच्या दारे खिडक्या उघडया ठेवाव्यात. लहान मुले अथवा पाळीव प्राणी यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. उच्च प्रथिनयूक्त व शिळे अन्न खाणे टाळावे. गडद घट्ट व जाड कपडे अंगात घालणे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास किंवा ऊन्हात कष्टाची शारीरिक श्रमाची काम करणे टाळावे. अशा प्रकारे उन्हाळयामध्ये नागरीकांनी उष्मालाटेपासुन बचाव होण्याच्या दृष्टीने दक्षता घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## भ्रष्टाचाराची चतु:सूत्री, वृक्ष लागवड कागदोपत्री !

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

**अधिकारी जगलेत, झाडे मात्र मेली....**

**रोपवाटीकेतले वृक्ष गायब !**

वनविभाग व जलसंपदा विभागामार्फत रापवाटीका योजना राबविण्यात येतात. मात्र या रोपवाटिकेतच वृक्ष नसल्यामुळे वृक्ष लागवड योजना कशी राबविणार असा प्रश्न पडला आहे. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.



वन विभागासह विविध विभागाच्या वतीने वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. जिल्ह्यात ग्रामपंचायतीसह विविध कार्यालयात वृक्षारोपण करण्यासाठी लाखो रुपयाचा निधी उपलब्ध होतो. मात्र निधी पूर्ण आपसात लाटून व कागदोपत्री वृक्षारोपण दाखवून शासनाच्या विविध प्रकारच्या कार्यालयामध्ये निधी लाटण्याचा प्रकार बहुतांश ठिकाणी घडला असुन वृक्षलागवडीतली झाडे मेलीत मात्र सबंधीत निधी खिशात घालुन अधिकारी मात्रजगलेत हेच चित्र सध्या पाहावयास मिळत आहे.तसेच तालुक्यात वृक्षारोपण फक्त कागदावरच दाखवले गेल्याचा प्रकारही झाल्याने याप्रकरणी चौकशी गरजेची असल्याची मागणी जोर धरत आहे. शासनाच्या वतीने शेतकोटी वृक्षलागवड योजना दरवर्षी राबविण्यात येते. त्यापैकी ५० ते ६० टक्केच रोपाची लागवड केली जाते. उर्वरित लागवड कागदोपत्री दाखवून निधी हडप केल्या जातो. अनेक जिल्ह्यात पावसाळा संपल्यानंतर वृक्षलागवड योजना राबविण्यात येते.

या योजनेत खासगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी आणि स्वयंमसेवी संस्थांच्या सहाय्याने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम पुर्ण करणे अपेक्षीत आहे. मात्र दरवर्षी शेकडो कोटी वृक्षलागवड होवूनही पुन्हा पुन्हा वृक्षलागवड योजना राबविली जाते. ही बाब म्हणजेच वृक्षलागवड योजना फक्त कागदोपत्रीच होत असल्याचे सिध्द होते. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

## समाधान शिबिरामध्ये ४२७ लाभार्थ्यांना दिलासा

**प्रमाणपत्राचे वाटप, तक्रारीचे निवारण, शासन आपल्या दारी उपक्रम**

**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**





छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा क्रमांक १ अंतर्गत दिनांक १०/०४/२६ रोजी सकाळी १० वाजता राजस्व मंडळ हिवरालाहे येथे रामसभा संस्थान सभागृह मध्ये मा.उपविभागीय अधिकारी कैलास देवरे कारंजा यांचे अध्यक्षतेखाली व तहसीलदार कारंजा रवी महाले यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे अध्यक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी कारंजा कैलास देवरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विनोदजी हरणे महसूल नायब तहसीलदार कारंजा, बनसोडे साहेब, नायब तहसीलदार निवडणूक, पूनम राणे मॅडम, गटविकास अधिकारी कारंजा, सरपंच हिवरालाहे सौ.वर्षाताई गजाननराव लाहे, तसेच अशोक पाटील टाके, विजय भेंडे, धाने पाटील हे सर्व मंडळातील उपस्थित होते.सदर समाधान शिबिरामध्ये १५ जातप्रमाणपत्र, १७ नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, ५ अधिवास प्रमाणपत्र, ४६ उत्पन्न दाखले, ७५ सातबारा व आठ अ उतारे, १५ संजय गांधी निराधार प्रमाणपत्र, १० श्रावण बाळ योजनेचे प्रमाणपत्र, ४ विवाह प्रमाणपत्र, १० इ रेशन कार्ड, ५ गोल्डन कार्ड, १४ कृषिविभागचे लाभ, १५ एकात्मिक बालविकास विभाग मार्फत किट व वय वंदना कार्ड आयुष्यमान कार्ड २१० वाटप करण्यात आले.असे एकूण ४२७ लाभार्थीना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता मंडळ अधिकारी जगदीश लोखंडे, ग्राम महसूल अधिकारी शैलेश घोगरे, शांताराम मुंडाले, रविंद्र कोरडे, अनिल बोरसे, उमाली एकघरे, नेहा खंडारे व महसूल मंडळातील सर्व महसूलसेवक, सामाजिक कार्यकर्ते गजानन लाहे पाटील, पोलिस पाटील देवीदास कवरे, ग्रामपंचायत शिपाई आदींनी अथक परिश्रम घेतले संपूर्ण कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती सदर कार्यक्रमात उपस्थित ग्रामस्थांकरिता अल्प उपहार व चहापाणी ठेवण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार विनोद हरणे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन राहुल वरघट ग्राम महसूल अधिकारी, कारंजा यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने मंडळातील शेतकरी व गावकरी, पत्रकार बांधव उपस्थित होते.

## य.च.महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**



स्थानिक श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर जि. वाशिम येथे राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे थोर समाजसुधारक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. संजय कावरे उपस्थित होते. प्रथमतः महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हाराप?ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल एन. सुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा. संजय कावरे यांनी आपल्या मनोगतात महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे आणि महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण व शोषित घटकांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक ठरते. त्यांनी अंधश्रद्धा, सामाजिक विषमता व अन्यायाविरुद्ध सजग राहण्याचे आवाहन केले. तसेच आधुनिक भारताच्या घडणीत समाज सुधारकांचे योगदान समजून घेऊन त्यांच्या विचारांची अंमलबजावणी आपल्या दैनंदिन जीवनात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आपण केवळ पुस्तकी ज्ञान न घेता सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमानंतर 'आधुनिक भारतातील समाज सुधारक' आणि 'आधुनिक भारतातील स्त्री शिक्षण' या विषयांवर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कार–दुचाकी अपघातानंतर दोन्ही वाहनांना आग, तीन गंभीर जखमी



प्रतिनिधी १३ एप्रिल

**मलकापूर :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर वडनेर भोलजी-धानोरा दरम्यान कार आणि दुचाकीच्या अपघातानंतर दोन्ही वाहनांना आग लागल्याची घटना रविवारी दुपारी सुमारे २.२० वाजता घडली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले असून, काही काळ घटनास्थळी 'बर्निंग' वाहनांचा थरार पाहायला मिळाला. मिळालेल्या माहितीनुसार, भुसावळ येथील तुषार पाटील (३१) व रुचिता पाटील (२९) हे दाम्पत्य त्यांच्या १० महिन्यांच्या चिमुकल्यासह नागपूरहून घरी परतत होते. त्याचवेळी वडनेर भोलजी येथील पांडुरंग वानखेडे (४१) हे दुचाकीने रस्ता ओलांडत असताना कार आणि दुचाकीची धडक झाली.अपघातानंतर काही मिनिटांतच दोन्ही वाहनांना आग लागली. भर दुपारी उसळलेल्या आगीमळे परिसरात एकच खळबळ उडाली.सुदैवाने अपघातानंतर दाम्पत्य चिमुकल्यासह तत्काळ वाहनाबाहेर पडले, तर दुचाकीस्वार दूर फेकला गेल्याने मोठी जीवितहानी टळली. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिस निरीक्षक सतीश महल्ले, सहायक पोलिस निरीक्षक प्रशांत राठोड, हेड कॉन्स्टेबल सचिन दासर व कॉन्स्टेबल निता मोरे यांच्यासह पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने मलकापूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले. जखमींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सत्रांनी दिली.अपघातानंतर काही मिनिटांतच दोन्ही वाहनांनी पेट घेतल्याने परिस्थिती भीषण बनली होती. सुदैवाने प्रवासी वेळेत बाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला. विशेष म्हणजे या अपघातात दहा महिन्यांचे बाळ सुखरूप बचावले, ही दिलासादायक बाब ठरली.

# रस्त्याच्या ठेकेदाराने जनतेला धरले वेठीस

प्रतिनिधी १३ एप्रिल

**◆ कासवगतीने सुरू असलेले काम दर्जाहीन ?**



**संग्रामपूर :** संग्रामपूर तालुक्यातील पातूर्डा येथील जिल्हा परिषद ते आठवडी बाजार या ५०० मीटर रस्त्याला मागील १ महिन्यापासून तयार करण्यास सर वात केली आहे.एक महिना झाला तरी रस्त्याची एक साईड ही पूर्ण पने झाली नाही.है कासवाच्या गती पेक्षा ही खूप कमी गती आहे.रस्त्याची कोणतीही एक साईड पूर्ण न केल्याने या रस्त्यावरील वाहतूक धारकांना मोठ्या प्रमाणत त्रास सहन करावा लागत आहे.या मुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून त्याच ऐकणार कोणीही नहीं या मुळे ते झालेला अन्याय सहन करत आहेत.या रस्त्यावर किरकोळ अपघात ही झाले आहेत.होत असलेल्या कामावर झोपलेले संबंधित विभाग लक्ष देत आहे की नाही ? हा प्रश्न आता जनता करत आहे.या रस्त्याचे काम इतके निकृष्ट दर्जाचे आहे की एक साईड पूर्ण होण्या पूर्वीच काही ठिकाणी रस्ता फुटला ही आहे.ठेकेदाराची मन मर्जी सुरू आहे.या मुळे या रस्त्याची आता गुण नियंत्रक विभाग कडून चौकशी करा अशी मागणी जनता करत आहे.

मागील ७ वर्षांपूर्वी खांडवी ते पंच गव्हाण या रस्त्याला कृष्णाई कंपनी ने कामास सुरवात केली होती.

मागील ७ वार्षा पासून या कंपनी ने काम अजून पूर्ण केले नाही.या रस्त्या मधील जिल्हा परिषद हायस्कूल तर आठवडी बाजार राधाकृष्ण मंदिर ५०० मीटर रस्त्याचे काम बाकी होते.या पूर्वी राधाकृष्ण मंदिर जवळ कंपनी व अधिकारी यांनी रस्त्याला गट्टू बंसिवतो बसविणार आहे असे सांगितले असता नागरिकांनी त्याला विरोध दर्शविला त्या मुळे रस्ता अपूर्ण अवस्थेत पडला होता.सादर कामास जनतेने म्हटल्या प्रमाणे सिमेंट रस्त्याचे काम सुरू केले.सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कंपनी याना सांगितले होते की जनतेला कोणताही त्रास होता काम नये.काम करताना एक साईड पूर्ण करावी मात्र कंपनी ने आपलीं मनमर्जी करत रत्याच्या दोनिही साईड अर्धवट परिस्थिती मध्ये करून ठेवून दिल्या.या मुळे शासकीय वाहन एस टी आठवडी बाजारात येऊ शकत नाही परिणामी एस टी महा मंडळच्य सर्व बसेस अर्धा की मी दूर सरकारी दवाखाना येथून परत होतात.या मुळे नागरिक याना एस टी येण्यापूर्वी अर्धा किमी पायी जाऊन भर उन्हात वीणा प्रवासी निवाऱ्या अभावी उभे राहावे लागत आहे.सध्या लगीन सराई असल्याने रस्त्यावर मोठी वर्दळ आहे.

आणि जनतेला प्रवास ही करावा लागतो अशातच ५०० की मी आणखी पायदळ चालावे लागत आहे.सरकारी बसेस मिळावी म्हणून वयोवृध्द गाडी येण्या पूर्वीच जाऊन बसतात आणि काही ची तर बस सुटून जाते.दोन्हीही साईड ने थोडा थोडा रस्ता केला मात्र त्या रस्त्यावर कंत्राटी कंपनी कडून पाणी मारणे बंद आहे.काही प्रमाणत रस्त्यावर बोंद्री टाकून ठेवल्या आहेत मात्र त्या ही दिवस भरातून एक वेळ ओल्या करण्यात येत आहे.रस्ता खोदून ठेवायचा आणि तो करायचंय नाही असा फंडा कंपनी कडून होत आहे.

# गव्हाच्या दरात तफावत; शेतकऱ्यांना कमी भाव, ग्राहकांकडून जादा पैसे वसूल!

प्रतिनिधी १३ एप्रिल

**◆ हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी; गुणवत्तेचे कारण**

**खामगाव :** जिल्ह्यात रब्बी हंगामातील गव्हाची काढणी जवळपास ९९ टक्के पूर्ण झाली असून, बाजार समित्यांमध्ये सध्या गव्हाची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. मात्र, आवक वाढताच गव्हाच्या दरात घसरण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने गव्हासाठी हमीभाव २,४२५ रुपये प्रति क्विंटल निश्चित केला असताना, बाजार समित्यांमध्ये प्रत्यक्ष खरेदी मात्र सुमारे १,६७५ ते २,१२५ रुपयांच्या दरम्यान होत असल्याची माहिती समोर आली आहे. शेतकऱ्यांकडून खरेदी होणारा दर आणि ग्राहकांना विक्री होणारा दर यामध्ये लक्षणीय तफावत दिसून येत आहे. सुरुवातीच्या टप्प्यात आवक कमी असताना गव्हाला २,६०० ते २,८०० रुपयांपर्यंत भाव मिळत होता; मात्र आवक वाढल्यानंतर विशेषतः लोकवन जातीच्या गव्हाचे दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. सध्या बाजार समितीत दोन्ही गहू विक्रीसाठी आणले जात आहेत.व्यापाऱ्यांकडून गहू स्वच्छ करून विक्रीसाठी तयार केला जातो, असे कारण दिले जात असले तरी सध्याचे शेतकरीही यांत्रिक पद्धतीने काढणी करताना गहू स्वच्छ करूनच बाजारात आणत आहेत. असे असताना गुणवत्तेचे कारण पुढे करून प्रतिक्विंटल सुमारे १,००० ते १,२०० रुपयांपर्यंत दर कमी केल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. आवक वाढल्यानंतर दर घसरल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.

मात्र, खरीप हंगामासाठी पैशांची आवश्यकता असल्याने नाइलाजास्तव विक्री करावी लागते.शेतकऱ्यांकडून कमी दरात खरेदी केलेला गहू व्यापाऱ्यांकडून ग्राहकांना ३,२०० ते ३,९०० रुपयांपर्यंत विकला जातो. यावरून दरातील तफावत स्पष्टपणे अधोरेखित होत आहे.

# रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त ; आरोपीविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १३ एप्रिल

**नांदुरा:** नांदुरा तालुक्यातील वडनेर भोलजी परिसरात रविवार, १२ एप्रिल रोजी रेतीची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांनी कारवाई करत चालकाला ताब्यात घेतले. या कारवाईत सुमारे ४ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे सुमारे ५:३० वाजता वडनेर भोलजी येथील मोहता विद्यालयासमोर ही कारवाई करण्यात आली. नांदुरा पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी गस्तीवर असताना त्यांना संशयास्पदरीत्या येणारा ट्रॅक्टर (क्रमांक एम. एच. २८ बीके ८७०१) दिसला.तपासणी केली असता ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास रेती आढळून आली. चालकाकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक परवाना किंवा रॉयल्टीची कागदपत्रे नसल्याने पोलिसांनी ट्रॅक्टरसह रेती जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात ट्रॅक्टर (अंदाजे किंमत ४,५०,००० रुपये) व एक ब्रास रेती (अंदाजे ३,००० रुपये) असा एकूण ४,५३,००० रुपयांचा समावेश आहे. या प्रकरणी जहाँगिरी खान मियाँखान (४३, रा. वडनेर भोलजी शिवार) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२), खाण व खनिज (विकास व नियमन) अधिनियम १९५७ चे कलम २१ (१), २१(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी प्रमोद राठोड यांनी फिर्याद दिली असून, पुढील तपास नवाज शेख करीत आहेत.

# प्रेमविवाहाचा राग; जावयाच्या भावावर जीवघेणा हल्ला!

प्रतिनिधी १३ एप्रिल

**◆ रॉड व दगडाने मारहाण; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

**नांदुरा :** तालुक्यातील पिंप्री अढाव येथे प्रेमविवाहाचा राग मनात धरून सासरच्या मंडळींकडून जावयाच्या घरी जाऊन जवायाच्या भावावर हल्ला केल्याची घटना ११ एप्रिल रोजी घडली आहे. या हल्ल्यात जावयाचा भाऊ गंभीर जखमी झाला असून, घरातील महिलांनाही मारहाण करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी १२ एप्रिल रोजी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामू गजानन अढाव (२२) यांनी मे २०२५ मध्ये अंजली गायकवाड हिच्यासोबत प्रेमविवाह केला होता. सुरुवातीला हे लग्न गुप्त ठेवण्यात आले होते; मात्र नंतर दोघेही रितीरिवाजाप्रमाणे एकत्र राहत होते. शनिवारी (दि. ११) दुपारी ४ वाजता अंजलीचे वडील व नातेवाइक तिला भेटण्यासाठी पिंप्री अढाव येथे आले होते. दरम्यान, दोन्ही बाजूंमध्ये चर्चा सुरू असताना मुलीच्या नातेवाइकांनी जमात जमवून घरासमोर गर्दी केली. त्यांनी अंजलीला बळजबरीने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी रामू व त्याची पत्नी असलेल्या कुटुंबीयांवर हल्ला करण्यात आला.

रामूचा भाऊ विठ्ठल अढाव हा जीव वाचवण्यासाठी शेताकडे पळत असताना आरोपींनी त्याचा पाठलाग केला. दुर्गेश धनोकार याने लोखंडी रॉडने, आदित्य ढंगे याने दगडाने, तर विशाल ढंगे याने कोयत्याने डोक्यावर वार करून त्याला गंभीर जखमी केले.जखमी विठ्ठल अढाव याच्यावर मलकापूर येथे उपचार सुरू आहेत.

# दाताळा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

प्रतिनिधी १३ एप्रिल

**मलकापूर :** जिल्हा परिषद बुनियादी प्राथमिक शाळा येथे १० एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते अभिवादनाने करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शेतकरी गीताने उपस्थितांची मने जिंकली तसेच स्वागतगीताने कार्यक्रमात रंगत भरली. कार्यक्रमाचे मंडळाधिकारी एस. आर. जिने यांनी प्रास्ताविक करून शिबिराचा उद्देश स्पष्ट कार्यक्रमाच्या केला. अध्यक्षस्थानी तहसीलदार समाधान सोनवणे होते. यावेळी परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी श्रीनिवास पवार, तालुका कृषी अधिकारी ललित सूर्यवंशी, भूमी अभिलेख उपअधीक्षक एकबोटे, नायब तहसीलदार राठोड, घोटकर व चव्हाण तसेच पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी एस. पी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य, पंचायत समिती, पाटबंधारे व भूमी अभिलेख विभागांसह विविध विभागांच्या माध्यमातून एकूण ३८२ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभदेण्यात आला.

# खामगांव अर्बन बँकेच्या प्रगतीची गरुड भरारी कायम : अध्यक्ष विजय पुंडे

**बँकेने कमावला ९.८८ कोटी निव्वळ नफा**

प्रतिनिधी १३ एप्रिल

**खामगाव :** सहकारी क्षेत्रात अग्रगण्य खामगांव अर्बन बँकेने आपली शुध्द नफ्याची परंपरा कायम राखत आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२६ अखेर रु.९.८८ कोटी निव्वळ नफा मिळविला असून ढोबळ नफा रु.३१.४८ कोटी झाला आहे. ढोबळ नफ्यामधून यावर्षी बँकेने काही शाखा रिनोव्हेशन, शिफ्टींग, नविन शाखा ओपनिंग, तसेच बी.डी.डी.आर.च्या प्रोव्हीजन्स केल्यानंतर सुध्दा रु.९.८८ कोटी निव्वळ नफा झाला आहे. संचालक मंडळाचे सुयोग्य धोरण व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शनामुळे व सर्वांच्या परिश्रमामुळे खामगांव अर्बन बँक 'एक आर्थिक सक्षम बँक' म्हणून नावारुपाला आली आहे. बँकेने २०२५-२०२६ आर्थिक वर्षात अकोट व मुर्तिजापूर या शहरांमध्ये नविन शाखांचा थाटात शुभारंभ केला आहे.



३१ मार्च २०२६ चे आधारावर बँकेने नियोजनबध्द वसुली केली असून नेट एन.पी.ए. शुन्य टक्के आहे. बँकेच्या एकूण ठेवी रु. १३२९.५६ कोटी असून यामध्ये लो-कॉस्ट डिपॉझीट रुपये ५२५.२१ कोटी आहे. लो-कॉस्ट डिपॉझीटचे प्रमाण ३९.५०ऱ आहे, हे प्रमाण इतर सहकारी बँकांच्या तुलनेत खूप जास्त आहे. बँकेने कर्जाचे व्याजदर माफक ठेवले असून कर्ज वाढीकरीता शाखांद्वारे मार्केटींग टीम व क्रेडीट कॅम्प इ. प्रयत्न केले आहे. त्यामुळे बँकेची कर्जे रु.७९६.६६ कोटीची आहेत व सी.डी. रेशो ५१.३२ऱ आहे. यावर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम कमी झाल्याकारणाने मार्केट मध्ये जिनींग प्रेसिंग, ऑईल मिल यांची पैशांची विशेष मागणी नव्हती, नाहीतर यापेक्षा जास्त कर्ज वाटप असते. बँकेचे नेटवर्थ मध्ये अतिशय समाधानकारक वाढ झाली असून नेटवर्थ रु. १५३.५२ कोटी आहे, सी.आर.ए.आर. २२.७९ऱ, शेअर कॅपीटल रु.३६.५२ कोटीचे आहे, तर राखीत निधी रु. २६०.६३ कोटी आहे. बँकेचे ९५ऱ पेक्षा जास्त डिपॉझीट सामान्य आणि मध्यमवर्गीयांचे आहे. यावरून बँकेवरील ठेवीदार, सभासदांचा विश्वास दिसून येतो..बँकेच्या या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक, मार्गदर्शक, संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व कर्मचारी वर्ग यांचा मोलाचा वाटा असून बँकेच्या प्रगतीसाठी अध्यक्ष प्रा. डॉ. विजय पुंडे, उपाध्यक्ष डॉ. सतिष कुळकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव तसेच संचालक मंडळ प्रयत्नशील आहेत. या आर्थिक वर्षात सुध्दा नविन शाखा उघडण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विजय पुंडे यांनी सांगितले.

# सरस्वती स्कूलच्या विद्यार्थ्यांचे ऑलिम्पियाड परीक्षेत सुयश

प्रतिनिधी १३ एप्रिल

**खामगाव :** मातोश्री जयाबेन जीवनलाल मेहता सरस्वती विद्यामंदिर येथील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सायन्स, मॅथ्स व इंग्लिश ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक वाढविला आहे. २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात घेण्यात आलेल्या या परीक्षेत एकूण २१२ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये मॅथ्स ऑलिम्पियाडसाठी १५० विद्यार्थी, इंग्लिश ऑलिम्पियाडमध्ये ३०, तर सायन्स ऑलिम्पियाडमध्ये ३२विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे या सर्व विद्यार्थ्यांचा १०० टक्के निकाल लागला आहे. सायन्स ऑलिम्पियाडमध्ये ओम चेतवानी, सुशांत भारसाकळे, अथर्व बागडे, पार्थ पाचपोर, तर मॅथ्स ऑलिम्पियाडमध्ये पीयूष बाळापुरे व ओम चेतवानी या विद्यार्थ्यांची सेकंड लेव्हलसाठी निवड झाली आहे. याशिवाय सुशांत भारसाकळे व ओम चेतवानी या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले आहे. इंग्लिश, मॅथ्स व सायन्स या विषयांत एकूण ५५ विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल पटकावून विशेष कामगिरी केली आहे. या यशाबद्दल निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रधानाचार्या टिकलेताई, संचालक मंडळ तसेच शिक्षकवृंदांनी स्वागत केले आहे.

# ग्रामीण भागात सीसीटीव्हीचा अभाव; चोरीच्या घटना वाढल्या!

प्रतिनिधी १३ एप्रिल

**खामगाव :** तालुक्यातील ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे सार्वजनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची गरज प्रकर्षाने पुढे येत आहे. खामगाव शहरात काही प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सुविधा उपलब्ध असली, तरी बहुतांश गावांमध्ये अशी कोणतीही यंत्रणा नसल्याने गुन्हेगारांना मोकळे रान मिळत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. मागील काही दिवसांत तालुक्यातील विविध गावांमध्ये चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. घरफोडी, शेतमाल चोरी तसेच दुचाकी चोरीच्या प्रकारांमुळे ग्रामीण नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी घडणाऱ्या घटनांमुळे गावकऱ्यांची झोप उडाली असून, सुरक्षा यंत्रणेवर ताण वाढत आहे.ग्रामीण भागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यास गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, घटनांची तत्काळ नोंद घेणे व तपास प्रक्रिया सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ग्रामीण भाग सुरक्षित ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचीसध्या बहुतेक गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने गुन्हेगारांचा माग काढणे पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. अनेकवेळा ठोस पुराव्याअभावी तपासात विलंब होत असल्याचे समोर येत आहे.ग्रामीण भागातील वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे. प्रत्येक गावातील मुख्य चौक, प्रवेशद्वार, बाजारपेठ, इतर सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी होत आहे.

# एप्रिलच्या पंधरवड्यात सहा दिवस तापदायक!

**◆ थंड हवेचे ठिकाण असलेल्या बुलढाण्यात उष्णतेच्या झळा**

प्रतिनिधी १३ एप्रिल

**खामगाव :** जिल्ह्यात एप्रिलच्या दुसऱ्या पंधरवड्यात उष्णतेची तीव्र लाट उसळण्याची शक्यता असून, १८ ते २३ एप्रिल या कालावधीत तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. अंदाजानुसार, १८ एप्रिल रोजी तापमान ४५ अंश, १९ एप्रिल रोजी ४६ अंश, तर २० ते २३ एप्रिलदरम्यान तापमान सुमारे ४५ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. सतत वाढणाऱ्या उष्णतेमुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेत घराबाहेर पडताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तापमान एप्रिल महिन्यात बुलढाणा जिल्हा विदर्भातील सर्वाधिक नोंदवणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक मानला जातो. यंदाही जिल्ह्यातील तापमान ४० अंशांच्या पार पोहोचले असून, पुढील काही दिवसांत त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाणारे बुलढाणा आता दरवर्षी उन्हाळ्यात विक्रमी तापमानाची नोंद करत असून एप्रिल ते जूनदरम्यान पारा ४४ ते ४६ अंशांपर्यंत पोहोचत आह बदलते प्रादेशिक हवामानचक्र, कमी पर्जन्यमान, जमिनीतील ओलाव्याची घट तसेच कोरडी हवामान स्थिती ही उष्णता वाढीमागील प्रमुख कारणे मानली जात आहेत. विदर्भासह मध्य महाराष्ट्रात वाढत्या उष्णतेच्या लाटा आणि 'हीट-लो' प्रणालीचा प्रभाव, यामुळे तापमान सतत उच्च पातळीवर राहण्याचा अंदाज आहे

# खासगी बाजारात कापसाचे दर वाढले ; पण शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ किती ?

प्रतिनिधी १३ एप्रिल

**◆ ७० ते ८० टक्के कापसाची आधीच शेतकऱ्यांकडून विक्री**

**खामगाव :** मागील काही दिवसांत कापसाच्या दरात वाढ झाल्याचे दिसून येत असले, तरी या दरवाढीचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांना मिळणार, हा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. कारण, बहुतांश शेतकऱ्यांनी आधीच कमी दरात कापूस विकून टाकला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांनी हंगामाच्या सुरुवातीला किंवा दर दबावात असताना कापसाची विक्री केली. त्यामुळे सध्या केवळ २० ते ३० टक्के शेतकऱ्यांकडेच कापूस शिल्लक आहे. परिणामी, सध्या वाढलेल्या दरांचा फायदा मर्यादित शेतकऱ्यांनाच मिळत असल्याचे चित्र आहे.यंदा अनेक महिन्यांपर्यंत कापसाचे दर अस्थिर व कमी पातळीवर राहिले दरातील

चढ-उतारामुळे शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता निर्माण झाली आणि त्यांनी जोखीम टाळण्यासाठी कापूस विकण्याचा निर्णय घेतला; मात्र आता दरात सुधारणा होऊन भाव सुमारे ८३०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. या पार्श्वभूमीवर दरवाढीचा अधिक फायदा व्यापाऱ्यांना होत असल्याची चर्चा शेतकरी वर्तुळात आहे. बाजारभावातील चढ-उतार आणि साठवणुकीच्या मर्यादा यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य दर मिळणे अजूनही आव्हान ठरत आहे.बाजारपेठेतील दर, मागणी-पुरवठा व भविष्यातील किंमत चढ-उतार याबाबत अचूक माहिती न मिळाल्याने शेतकऱ्यांना योग्य वेळी पिकांची विक्री करणे कठीण जात असल्याचे चित्र आहे. यामुळे अनेकदा शेतकरी कमी दरात माल विकण्यास भाग पडतात. तज्ज्ञांच्या मते, बाजारभावातील बदलांची वेळेवर माहिती मिळाल्यास शेतकरी निर्णय घेऊ शकतात. मात्र, ग्रामीण भागात माहितीचा अभाव व मार्गदर्शनाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेचा अचूक अंदाज बांधणे अवघड जाते. या परिस्थितीत शेतकऱ्यांना योग्य माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आवश्यक असून, त्यामुळे त्यांना त्यांच्या उत्पादनाला दर मिळविण्यास मदत होऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com





# सूर्य ओकतोय आग..! अकोल्याच्या तापमानाची वाटचाल 45 अंशाकडे!

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** शहराचे तापमान एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून आपलेच विक्रम मोडत असल्याचे दिसून येत आहे. सलग दोन दिवसांपासून अकोल्याच्या तापमानाची उच्चांकी नोंद होत आहे. शनिवारी शहराचे तापमान ४२ अंश असतानाच रविवारी या तापमानात १ अंशाने वाढ होत ते ४३.०१ अंशावर पोहोचले होते. तापमानाची ही वाढती गती पाहता लवकरच ४५ अंशावर पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मार्चमध्ये तापमानाची उच्चांकी नोंद झाल्यानंतर वातावरणात बदल होऊ काही भागात अवकाळी पावसासह गारपीट झाली होती. त्यामुळे तापमानाचा पार खाली आला होता. दरम्यान १५ दिवस पावसाळी आणि ढगाळ वातावरणामुळे अकोलेकरांना दिलासा मिळाला असतानाच एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून सूर्य पुन्हा आग ओकण्यास सुरूवात झाली आहे. शनिवारी अकोल्याचा पारा ४२ अंशावर पोहोचला होता. हे तापमान विदर्भात सर्वाधिक होते. त्यानंतर रविवार, १३ एप्रिलला अकोल्याचे तापमान ४३.१ अंश सेल्सियस असल्यामुळे ते राज्यात सर्वाधिक होते. आणखी काही दिवस उष्णेतची लाट कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.



तसेच नागरिकांनी शक्यतोवर दुपारच्या वेळी घराबाहेर पडू नये, आवश्यक काम असल्यास भरपूर पाणी प्यावे, लिंबू सरबत, ताक, ज्यूस यांचे सेवन करावे, उपासीपोटी उन्हात फिरू नये, अंगमेहनतीची कामे भरउन्हात करू नये, असे आवाहन तज्ज्ञांद्वारे करण्यात आले आहे.

## नागरिकांची लाही-लाही; नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन




### दिवसा उन्हाच्या झळा रात्री गारवा!

◆दिवस व रात्रीच्या तापमानात मोठ्या प्रमाणात फरक पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे रूग्णालयात गर्दी दिसून येत आहे. घसा कोरडा पडणे, अशक्तपणा, डोकदुखी, चक्कर येणे अशी लक्षणे रूग्णांमध्ये जाणवत आहेत. त्यामुळे नागरिकांनी उन्हामध्ये फिरणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उन्हापासून बचावासाठी हे उपाय करा!

◆उन्हामध्ये फिरणे टाळा, भरपूर पाणी प्यावे, टरबूज, खरबूज, द्राक्ष, काकडी अशी पाण्याचे प्रमाण अधिक असलेल्या फळांचे सेवन करा, डोक्याला व कानाला रूमाल, शेला बांधा, शक्यतोवर काळ कपडे टाळावे, संतुलीत आहार घ्या, जास्त मसालेदार पदार्थ खावू नये, उपासी पोटी अंग मेहनतीची कामे टाळावी.

### रविवारी प्रमुख शहरातील तापमान

| | |
|---|---|
| अकोला | ४३.१ |
| वाशिम | ४१.६ |
| बुलडाण | ४०.६ |
| अमरावती | ४२.४ |
| चंद्रपूर | ४१.० |
| गडचिरोली | ४१.० |
| वर्धा | ४२ |
| नागपुर | ४१.४० |
| यवतमाळ | ४०.२० |

# आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये 'विद्यारंभ संस्कार' सोहळा संपन्न

### विद्यार्थ्यांसह पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग, मंत्रोच्चाराने परिसर भक्तिमय

१३ एप्रिल

**अकोला :** येथील आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये 'विद्यारंभ संस्कार' सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह या पूजेत सहभाग नोंदवत आपल्या शैक्षणिक प्रवासाची मंगलमय सुरुवात केली. अक्षर ओळखीने विद्यार्थ्यांच्या या शिक्षण प्रवासाचा श्रीगणेशा झाला. अकोला शहरातील आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये रविवार, १२ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता विद्यारंभ संस्कार सोहळा थाटामाटात पार पडला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक आपल्या लहान मुलांसह उपस्थित होते. हिंदू धर्मातील सोळा संस्कारांपैकी एक महत्त्वाचा संस्कार म्हणजे 'विद्यारंभ संस्कार' असून, याद्वारेच मुलांच्या शिक्षणाची खऱ्या अर्थाने सुरुवात होते. याच पार्श्वभूमीवर शाळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



होते.कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वतीच्या पूजनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी ज्ञान आणि बुद्धीसाठी प्रार्थना केली. पंडितांच्या मार्गदर्शनाखाली हवन कुंडात आहुती देण्यात आली आणि मंत्रोपचार करण्यात आले. त्यानंतर, विद्यार्थ्यांना अक्षरांची ओळख करून देण्यात आली आणि मुलांनी पाटीवर अक्षरे गिरवून आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला. याप्रसंगी शाळेचे संचालक दिलीपराजजी गोयनका, सौरभ गोयनका, प्राचार्य कुरियाचन सी.पी. आणि उपप्राचार्या श्वेता चोमवाल उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी भगवान गणेश आणि गायत्री मातेची आरती करण्यात आली आणि उपस्थितांना प्रसाद वाटण्यात आला. मंत्रोच्चारामुळे संपूर्ण परिसर भक्तीने न्हाऊन निघाला होता. मुलांच्या आयुष्यातील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा संस्कार अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले व आभार मानले.


# राम बंधू मसाल्याचे अकोलेकर ठरले भाग्यवान ग्राहक

### अकोल्याच्या शुक्ला दाम्पत्याला मिळाली आलिशान कार

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** राष्ट्रीयस्तरावर प्रसिद्ध असलेल्या एम्पायर स्पाइसेस अँड फूड्स लिमि. अर्थात राम बंधू कंपनीच्या वतीने राबविण्यात आलेल्या भाग्यवान ग्राहक योजनेत अकोल्यातील शुक्ला दाम्पत्याने बाजी मारली आहे. स्थानिक गीता नगर येथील उमेश शुक्ला आणि ज्योती शुक्ला यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस म्हणून आलिशान कार देऊन गौरविण्यात आले.

जठारपेठ येथील रत्नम सभागृहात शनिवारी हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. राम बंधूच्या वतीने लोणचे खरेदीवर ही राष्ट्रीय स्तरीय योजना सुरू करण्यात आली होती. यामध्ये सोन्याची नाणी, आयफोन आणि कॅशबॅक यांसारखी हजारो



बक्षिसे होती, मात्र प्रथम क्रमांकाचे 'कार' हे मोठे बक्षीस अकोल्याच्या पदरात पडले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान व्यावसायिक गुलशन कृपलानी यांनी भूषविले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राम बंधूचे सीईओ यश राठी, पश्चिम विदर्भाचे मुख्य स्टॉकिस्ट मनोज मानसिंघका, रिजनल इन्चार्ज सुदेश जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते.संगीतमय गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली, त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते कारची चावी शुक्ला दाम्पत्याला सुपूर्द करण्यात आली. यावेळी भव्य आतिषबाजी करण्यात आली.

कंपनीचे सीईओ यश राठी म्हणाले, उच्च गुणवत्ता आणि भेसळमुक्त उत्पादने ही राम बंधूची ओळख आहे. चिवडा आणि पापड मसाल्याची संकल्पना सर्वप्रथम राम बंधूनेच मांडली. ग्राहकांशी असलेले नाते दृढ करण्यासाठी कंपनी अशा विविध योजना आणि सामाजिक उपक्रम राबवत असते.कार्यक्रमाचे संचालन सुनील नावंदर यांनी केले, तर आभार मनोज मानसिंघका यांनी मानले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सागर जूनगडे, शिवशंकर राऊत, जितेंद्र पांडव, सचिन दळवी आणि राम बंधूच्या संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.

# एथिलीन राइपनरच्या सहाय्याने पिकवले जात आहेत फळे

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** उन्हाळ्याच्या दिवसांत बाजारपेठेत आंबा, केळी, पपई, खरबूज आणि टरबूज यांसारख्या फळांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेता, काही व्यापारी कच्ची फळे लवकर पिकवण्यासाठी 'इथिलिन रायपनर' सारख्या रसायनांचा वापर करत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

शहरात विकली जाणारी अनेक फळे नैसर्गिकरित्या पिकलेली नसून, ती कच्ची असतानाच बाजारात आणली जातात. त्यानंतर बंद खोल्यांमध्ये किंवा गोदामांमध्ये रासायनिक प्रक्रियेद्वारे ती पिकवली जातात. फळांच्या ढिगाऱ्यात 'इथिलिन रायपनर'च्या बाटल्या ठेवून किंवा त्यावर फवारणी करून काही तासांतच फळे पिवळी केली जातात. यामुळे ग्राहकांना ही फळे ताजी आणि नैसर्गिक वाटतात; मात्र प्रत्यक्षात ती कृत्रिम पद्धतीने तयार केलेली असतात.दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, या रासायनिक प्रक्रियेचा वापर वाढत असतानाही अन्न व औषध प्रशासनाकडून अपेक्षित तपासणी होताना दिसत नाही. गेल्या अनेक दिवसांपासून नियमित तपासणी झालेली नाही. केवळ तक्रार प्राप्त झाल्यानंतरच कारवाई केली जाते, त्यामुळे बाजारातील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारे पिकवलेली फळे मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकतात. यामुळे प्रामुख्याने श्वसनाचे विकार, किडनीचे आजार, हृदयरोग विकार जडण्याची शक्यता आहे. मात्र, अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीही कारवाई झाली नाही.

### कृत्रिम पद्धतीने पिकवलेल्या फळे खाणे आरोग्यासाठी घातककृत्रिम पद्धतीने पिकवलेल्या फळे खाणे आरोग्यासाठी घातक



# निरोगी समाजासाठी एमएचएफडीएच चे पाऊल

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** निरोगी समाजाच्या सशक्त उभारणीसाठी संवेदनशीलतेने उचललेले एक प्रेरणादायी पाऊल म्हणून महाराष्ट्र होमिओपॅथिक महिला डॉक्टर्स असोसिएशन (श्ह्ई्रं) व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित मुफ्त दंत तपासणी व सर्वसमावेशक आरोग्य शिबिर हे श्री डेंटल क्लिनिक, सरकारी गोडाऊन समोर, सिंधी कॅम्प रोड, अकोला येथे उत्साहपूर्ण आणि लोकाभिमुख वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाले. या उपक्रमाचे आयोजन डॉ. माधुरी राठोड यांच्या पुढाकारातून साकार झाले. प्रभाग क्र. १६ चे नगरसेवक श्री. सिद्धार्थ भाऊ उपरवट व सौ. आम्रपाली ताई उपरवट यांच्या सहकार्याने, तसेच डॉ. स्वाती राठोड (शिरसाट) यांच्या सुयोग्य समन्वयातून या शिबिराला यशाचे शिखर गाठता आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कल्पना भिसे विराजमान होत्या. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी 'निरोगी समाज हाच सशक्त राष्ट्राचा पाया' हा विचार प्रभावीपणे मांडत,

### ♦ मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



आरोग्यजागृतीच्या अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. या शिबिरामध्ये दंत तपासणी, विविध आजारांचे निदान, आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच होमिओपॅथिक औषधांचे विनामूल्य वितरण करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सेवांचा लाभ घेतला. या शिबिरात अध्यक्ष डॉ. कल्पना भिसे, उपाध्यक्ष डॉ. हेमलता लद्दड, सचिव डॉ. हर्षलता कोले, सल्लागार डॉ. अस्मिता देशमुख व समन्वयक डॉ. स्वाती राठोड तसेच डॉ. उषा खर्चे पाटील, डॉ. रुपाली खारोडे, डॉ. वैशाली दोसे, डॉ. गुलबक्षी मोहोकार, डॉ. प्रियंका अग्रवाल, डॉ. कल्पना धोटे यांनी सेवाभावी वृत्तीने नागरिकांची तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी सौ योगिताताई पावसाळे, श्री पंकज गावंडे, मोहम्मद रफीक सिद्दिकी, सय्यद वसीम, फैयाज खान, श्री गजानन सोनोने, श्री आनंद बलोदे, ?ड. श्री धनंजय धबाले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. योग्य वेळी तपासणी व मार्गदर्शन मिळाल्यास अनेक आजार टाळता येतात. अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्यजागृतीची नवी दिशा निर्माण होते. रोग होण्यापूर्वीच त्याचा प्रतिबंध करणे हेच खरे आरोग्यसंपन्न जीवनाचे गमक आहे असे मनोगत लोकप्रतिनिधींनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ उपरवट, मोहड व प्रा. रोहण शिरसाट यांनी, तर आभार प्रदर्शन सौ. आम्रपाली उपरवट यांनी केले.

# महापालिकेत ठेकेदारांवर कारवाई संदर्भात जनप्रतिनिधी व प्रशासन आमने सामने

## प्रशासनाला उगाच बदनाम करू नका-आयुक्तांचा सज्जड इशारा

प्रतिनिधी १३ एप्रिल

**अकोला :** :आज महापालिकेची विविध विषयांना घेऊन विशेष सर्वसाधारण सभा संपन्न झाली. राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून कामे प्रस्तावित करणे, धोकादायक विहिरींवर जाळी लावून बंद करणे, महापालिकेच्या ज्या कंत्राटदारांनी रिकवरी काढलेली रक्कम भरणा केली नाही तसेच बांधकामाची कामे वेळेमध्ये पूर्ण न केलेल्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकने, हद्दवाढ भागातील पाणीटंचाई निवारण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठविणे, तसेच शहरातील कचरा घंटागाडीचे नियोजन व्यवस्थित न झाल्याने याबाबत पुन्हा नव्याने निविदा प्रक्रिया




करून ६०० रुपये प्रतिघर व्यावसायिक शुल्क प्रस्तावित करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. आज स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांचा वाढदिवस असल्याने सर्वांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. शहरात ठेकेदार रस्ते बनवतात पण त्यावर पाणी न मारल्याने रस्ते लवकर खराब होतात, ठेकेदारांच्या मनमानीवर अंकुश लावण्याची मागणी अनेक नगरसेविकांनी केली विशेषता गोल्डी बाबू आणि कोठारी या दोन ठेकेदारांना विरोधात नगरसेवकांचा रोष दिसून आला. जुने शहरातील स्मशानभूमी बाबत अनिल गरड मंजुषा शेळके यांनी जोरदार आवाज उचलला १९ एकच स्मशानभूमीवर संपूर्ण अतिक्रमण झाले आहे मृतदेहांना दफन करण्यासाठी जागा सुद्धा उरली नसल्याने एक तर अतिक्रमण हटवावे किंवा दुसरी जागा उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली. एक दिवस आधी मच्छी मार्केट परिसरातील महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या कत्तलखान्यावर पोलिसांनी धाड टाकून ३२ गोवंशांना जीवनदान दिले. त्याबाबत पोलिसांचे अभिनंदन करून हा अवैध कत्तलखाना उद्ध्वस्त करण्याची मागणी उपमहापौर अमोल गोगे यांनी केली. प्रशासन काळात ठेकेदारांनी ४० ते ४५ टक्के बिलोने

### 'आयुक्तांचा बाणेदारपणा'

प्रशासन काळातच काही चुकीचे घडले का? प्रशासन काळातच भ्रष्टाचार झाला का? प्रशासक काळ नसताना महापालिकेत भ्रष्टाचार झालाच नाही का? हा प्रश्न आयुक्तांनी विचारीत जर काही चुकीचे झाल्यास आमच्याकडे तक्रार घेऊन यावी. आम्ही संपूर्ण चौकशी करू, परंतु उगाच प्रशासनाला बदनाम करू नका, माझ्या कार्यकाळात थर्ड पार्टी ऑडिट करूनच ठेकेदारांना बिल देण्यात आली. माझ्या काळातच ठेकेदारांवर कारवाई झाल्याचे सुद्धा त्यांनी ठासून सांगत नगरसेवकांना जोरदार खडसावले. त्यावर नगरसेवक जयंत मसने सगळ्यांच्या स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सर्व नगरसेवकांतर्फे दिलगिरी व्यक्त केली.

ठेकेदारांनी कामे केली याबाबत नगरसेवक सुनील मेश्राम यांनी आश्चर्य व्यक्त करीत प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. तर प्रशासकीय काळात ज्या ठेकेदारांनी भ्रष्टाचार करून आपले उखळ पांढरे करून घेतले त्या सर्व ठेकेदारांची चौकशी करण्याची मागणी सुद्धा काही नगरसेवकांनी केली.

### ठेकेदार झाले राजकारणी-- विजय अग्रवाल

आमच्या काळात १६ कोटीचे रस्ते बांधण्यात आले ते अद्यापही सुस्थितीत आहेत. परंतु आजकाल जे कोणी कंत्राटदार चुकीचे करत असतील, ज्यांच्याकडे मशीनरी नाहीत, बिलोने कामे करतात, वेळेवर काम करीत नाहीत, भानगडी करून ठेवतात अशा ठेकेदारांवर कारवाई करावीच लागेल. अनेक ठेकेदार तर प्रभागातील चौघाही नगरसेवकात भांडणे लावण्याचे काम करीत राजकारणी झाल्याचे विजय अग्रवाल यांनी सांगितले. रिकवरी न भरणाऱ्या ठेकेदारांच्या सातबारावर महापालिकेच्या रकमेची नोंद झाली पाहिजे किंवा अन्य शासकीय विभागात हे ठेकेदार ठेकेदारी करत असतील तर त्यांच्या बिलातून ही रक्कम कापण्यात यावी अशी मागणी करत विजय अग्रवाल यांनी हा प्रस्ताव मंजूर करण्याचे आवाहन महापौरांना केले त्यावर महापौरांनी हा प्रस्ताव पास केल्याची घोषणा केली हद्दवाढ झालेल्या भागात पाणीटंचाई निवारण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवणे बाबत हद्द वाढ झालेल्या भागातील नगरसेवकांनी अतिशय पोटतिडकीने आपली मते व्यक्त करीत हद्दवाढ भागातील पाणीटंचाई दूर करण्याची मागणी केली बातमी लिहेस्तोवर सभा सुरूच होती त्यामुळे कचरा घंटा गाडीच्या शुल्क वाढीबद्दल सभागृहात काय निर्णय होतो त्याबद्दल माहिती मिळू शकली नाही

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK